
शुभम शरद पाटील
श्रवणधारा
The Love story in
Second Innings....

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# श्रवणधारा

(लघुकादंबरी)

लेखक : शुभम शरद पाटील

# श्रवणधारा

लेखक - शुभम शरद पाटील
फोन नंबर - +९१ ९८२३३ ८६३११
ईमेल - shubhampatil111295@gmail.com
वेबसाईट - https://grabcad.com/shubham.patil-10
पत्ता - १. कमलानंद, ३४, डॉ. हेडगेवार नगर,
धरणगांव,(४२५१०५) जिल्हा - जळगांव
२. श्री स्वामी समर्थ नगर भातखंडे बु.।। (४२४२०१)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www.esahity.com
esahity@gmail.com
प्रकाशन : ७ एप्रिल २०२१ (पापमोचनी एकादशी)
©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



तसं लिहिण्याची सुरुवात म्हणाल तर ती लहानपणापासूनच झाली. साधारणतः सातवीमध्ये एक गोष्ट लिहिली होती. त्यानंतर उगाच काहीतरी पंधरा कागद निळा करणं सुरू असायचं. या निळ्या कागदाला खरं महत्व प्राप्त झालं ते माझ्या पहिल्या पुस्तकामुळे – वाराणसीमुळे. आपण काहीतरी लिहू शकतो अशा आत्मविश्वासाने जोर धरला आणि मग लिहीत गेलो.

माझ्या मते म्हणाल तर साहित्य म्हणजे तेच असते जे समाजाचे खरे रूप दाखवते आणि तसं साहित्य वाचून समाजावर काही सकारात्मक (शक्यतो) फरक पडणार असेल तर लेखक म्हणून गौरविल्याचा फायदा होतो. साहित्य म्हणजे ज्ञानाचा अथांग महासागर आहे आणि त्यात हे थेंबभर ओतण्याचा प्रयत्न.

इति लेखनसीमा.

**शुभम शरद पाटील**, BE Mechanical,

Racing Car designer, Online software tutorials, ऐतिहासिक पुस्तके आणि वारसा स्थळांबद्दल आवड आहे. मोडी लिपीची विशेष आवड आहे. वेळ मिळेल तसे मोडी लिप्यांतर करत असतो.

## प्रस्तावना

नमस्कार, “ई-साहित्य प्रतिष्ठान”वर माझे हे पाचवे पुस्तक. पाचवे पुस्तक लिहायला-प्रकाशित करायला मिळणे हे आपल्यासारख्या रसिक वाचकांमुळे शक्य झाले.

“वृद्धाश्रम” असं नाव जरी उच्चारलं तरी मनात भावनांचा संमिश्र कल्लोळ होतो. मुळात ही संकल्पनाच भयंकर आहे. शहरी भागात या वृद्धाश्रमांची संख्या आणि त्यात राहणाऱ्यांची संख्या वाढत चाललेली आहे. ही बाब निःसंशयपणे चिंताजनक आहे. आयुष्याची सायंकाळ आपल्या नातवंडांचे कौतुक करण्यात, मुलाबाळांचे यश बघण्यात घालवावे अशी एक प्राथमिक इच्छा कुठल्याही दांपत्याची असते. पण काळचक्र असं वेगळयाच पद्धतीने फिरतं आणि आयुष्याच्या नेमक्या सायंकाळी घराबाहेर होण्याची वेळ येते. ही तीच रम्य सायंकाळ असते जिथे दिवसभरच्या दगदगीतून थोडा निवांत वेळ मिळतो. पण नियतीच्या पुढे कुणाचं चालतं?

वृद्धाश्रमांची नावं, सोयी वगैरे सगळं छानछान आणि मस्त असतं असं निदान दुरून तरी वाटतं. पण तिथे राहणाऱ्यांचे काय? वरकरणी जरी ते शांत आणि आनंदी दिसत असले तरी त्यांच्या मनात अविश्रांत ढवळाढवळ चाललेली असते. ती

कधीच बाहेर येत नाही आणि कधीतरी स्फोट होऊन एकदाच कायमची शांतता होते.

पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धतीत घरात खूप माणसे असत. वृद्ध, अपंग, आजारी माणसांची काळजी घेत. कुटुंब एक अशी भावना असे, त्यामुळे या गोष्टी जिव्हाळयाने होत. आज-काल कुटुंबात मोजकीच माणसे असतात. घरातील स्त्री पण नोकरीसाठी बाहेर पडते, त्याचबरोबर पाळणाघर व तयार आहार अशा सोयींमुळे वडीलधाऱ्या माणसांची, त्यांच्या अनुभवांची गरज उरत नाही. सध्या सर्व क्षेत्रात जग इतक्या गतीने पुढे जात आहे की, घरातील माणसांना एकमेकांची साधी चौकशी करायला वेळ मिळत नाही. मग लहानशा घरात अडगळ होते. या गतिमान जीवनात त्यांच्यासाठी देण्यास तरुणांकडे वेळ नसतो. मग वृद्धाश्रमांत रस्ता दाखवला जातो.

ह्या लघु-कादंबरीतला वृद्धाश्रम जरा वेगळा आहे. इथल्या वृद्धाश्रमातली लोकं जरा सकारात्मक पद्धतीने हे जगणं एंजॉय करताहेत. थोडा वेगळा विचार करून आपआपल्या पद्धतीने मस्तपैकी आयुष्य जगताहेत. एकमेकांची थट्टा-मस्करी करताहेत. कधीकधी एकदम पूर्वायुष्याची आठवण आल्यावर गंभीर होताहेत. पुढच्याच क्षणाला ते सगळं विसरून परत नॉर्मल होताहेत. असं सगळं एकंदरीत चाललेलं आहे. हरवलेलं

प्रेम वृद्धाश्रमात आयुष्याच्या एका वेगळयाच वळणावर भेटणं म्हणजे आमवास्येच्या मध्यरात्री सूर्योदय होण्यासारखे होते. प्रोफेसर अरुण महाजन आणि सुधा साठे यांची ही गोष्ट. त्यात प्रेमकथा वगैरे लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न. वाचून झाल्यावर अभिप्राय नक्की कळवा. काही चुकले असेल तर आवर्जून सांगा. म्हणजे सुधारणा करण्यावर भर देता येईल.

श्री सुनीळ सामंत सर आणि संपूर्ण ई-साहित्य टिमचे मनापासून आभार.

- ***शुभम शरद पाटील.***

***०७ एप्रिल २०२१***

***(पापमोचनी एकादशी)***

# अर्पणपत्रिका

**जगाच्या उत्पत्ति, स्थिति आणि लयाला कारणीभूत**
**अशा**

**एकमेवाद्वितीय चैतन्यशक्तीस...**

# श्रवणधारा

## The Love story in Second Innings.....

ही लघुकादंबरी पुर्णतः काल्पनिक असून त्यातील स्थळे, नावे व प्रसंग पुर्णतः काल्पनिक आहेत. यांचे कोणत्याही वास्तव स्थळ वा व्यक्तींशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

“हो, काहीच प्रॉब्लेम नाही. तुम्ही या रविवारी आणि रविवारी नाही जमलं तर सोमवारी या. आठवड्याचे सर्व दिवस आम्ही हजर असतो. त्यामुळे निश्चिंत रहा.” नेटवर्क प्रॉब्लेम असल्याने ‘निवारा’ वृद्धाश्रमाचे मॅनेजर बाहेर पटांगणात येऊन बोलत होते. ‘निवारा ओल्ड केयर’ हा मुंबई-पुणे हाय-वे च्या मध्ये कुठेतरी निसर्गरम्य वातावरणात उभारलेला वृद्धाश्रम होता. भलेमोठे पटांगण, समोर ऑफिस, ऑफिसच्या एका बाजूला किचन, वाचनालय वगैरे होते आणि दुसऱ्या बाजूला कॉमन हॉल. तिथं टीव्ही वगैरे होता, पण आयुष्याच रस्ता असा संपत आलेला असताना यांच कशात मन लागणार होतं? असो, शिवाय ऑफिसवर वृद्ध कपल्ससाठी सोय, पटांगणाच्या एका बाजूला वृद्ध स्त्रिया आणि दुसऱ्या बाजूला वृद्ध पुरुषांची सोय होती. पटांगणाच्या मधोमध एक मंदिर होते. तिथे रोज सायंकाळी प्रार्थना व्हायची. पटांगणाच्या आवारात भरपूर झाडे वगैरे लावली होती आणि तिथेच बसायला बाकं होती. महिन्याभारत एखादं म्हातारं व्यक्ती हमखास यायचं. आता तिथल्या व्यक्तींची संख्या सुमारे पन्नास झाली होती.

पन्नास जणांचे एक मोठे कुटुंब होते ते. ज्यांच्यामुळे कुटुंब तयार झाले होते, त्यांना आता कुटुंबात ठेवत नव्हते. म्हणून हे मोठे कुटुंब वगैरे.

“चला, अजून कुणी तरी आपल्या पालकांची सोय लावली वाटतं.” मॅनेजरचं बोलणं ऐकून महाजन काका खाली आलेला चश्मा परत नाकावर चढवत म्हणाले.

“सोय कशाला, जड झाले असतील त्यांना त्यांचे जन्मदाते. जसे आपण झालोत.” बर्वेकाका महाजन काकांकडे पाहत म्हणाले.

“तू म्हणतोस तेसुद्धा काही खोटं नाही म्हणा.” महाजन काका म्हणाले.

“मग, नाहीतर काय. मी कधीच खोटं बोलत नाही. स्पष्ट बोलतो. म्हातारा असलो तरी. खरे दात पडून कवळी आली म्हणून माझी वाचा बदलेल की काय? अरे महाजना, मला माहितीये माझ्या मुलाला मी जड झालो म्हणून त्याने मला इथं आणून सोडलं आणि कारण काय दिलं मूर्खाने तर निसर्गाच्या सानिध्यात रहायला मिळेल म्हणे. कशाचा निसर्ग आणि कशाचे काय?” बर्वेकाका तावातावाने बोलत होते.

“बर्वे, ठीक आहे. अरे बाबा, इथली सगळी मंडळी तशीच. माझ्या म्हणण्याप्रमाणे सोय लावलेली किंवा तुझ्या म्हणण्याप्रमाणे जड झालेली. पण आता किती दिवस तू हे शल्य स्वतःच्या मनाला लावून घेणार आहेस? सहा महीने झाले तुला इथे येऊन. पण तू रोज

तुझ्या मुलाचं नाव काढल्याखेरीज राहत नाहीस आणि म्हणतोस मी विसरलो त्याला. मला बघ, एक वर्ष झालं इथं येऊन. मी काढली का कधी आठवण माझ्या मुलाची? माझी परिस्थिती काही वेगळी नाही.'' महाजन काका समजावणीच्या सुरात सांगत होते.

''चला, सहा वाजलेत. प्रार्थनेची वेळ झाली. येताय ना मंदिरात?'' अण्णांच्या प्रश्नाने बर्वे काकांनी घड्याळात बघितले आणि म्हणाले, ''अरे, सहा वाजले पण. चला.''

ते तिघं हळूहळू मंदिराच्या दिशेने जाऊ लागले.

महाजन काका एक रिटायर्ड प्राध्यापक होते. त्यांना वृद्धाश्रमात येऊन एक वर्ष झाले होते. सहा वर्षापूर्वी त्यांच्या पत्नीचे निधन झाले होते. त्यांचा एकुलता एक मुलगा विनय हा एक आयटी इंजिनीअर होता. अमेरिकेत मोठ्या कंपनीत मोठ्या हुद्द्यावर होता. शिक्षण झाल्यावर काही वर्ष म्हणून लग्नाआधी तो तिकडे गेला तो कायमचाच. लग्नसुद्धा तिकडेच एका भारतीय वंशाच्या मुलीशी केले मग. दोन-तीन वर्षानी एखादी भेट द्यायचा भारतात. मग हळूहळू भेटी आणि फोन कमी होत गेले. मग ते बंद केव्हा झाले हे कळलं देखील नाही. घरात महाजन काका-काकू असे दोघंच रहात. घर कसलं? एक मोठा बंगला होता तो. घरात कामाला नोकरचाकर होते. पण घरात घरातले माणसंच नसतील तर बोलणार कुणाशी?

भिंतींशी? भिंतींना कान असतात म्हणे, पण नुसतं ऐकून काय उपयोग? बोलणारं कुणीतरी हवं ना...

नोकरीच्या काळात आपण पैशांच्या मागे धावलो आणि आता मोकळा वेळ आहे तर बोलायला कुणी नाही. याची खंत त्यांना लागून असायची. महाजन काकूंची तब्येत अचानक बिघडली आणि हृदयविकारच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. आधीच एकटे असलेले महाजन काका अजून एकटे पडले. पंधरा दिवसांनी एक फोन आला होता विनयचा. कामात व्यस्त असल्याने येऊ शकलो नाही असं म्हणाला तेव्हा इकडे महाजन काकांच्या डोळ्यातून अश्रु सुरू झाले होते. दिवसभर महाजन काका पुस्तकं वाचत बसत. करण्यासारखं असं काही उरलंच नव्हतं आता आयुष्यात. ऐन वेळी जिची साथ हवी होती ती अचानक सोडून गेल्याने ते मायामोहाच्या गिल्मिशांपासून हळूहळू दूर जात होते. पण जसं जन्म घेणं आपल्या हातात नसतं तसंच मरणसुद्धा त्या विधात्याच्याच हातात असतं हे त्यांना कळून चुकलं होतं. जगण्याला पर्याय नव्हता. एकट्याने पाच वर्ष कसेबसे काढल्यावर त्यांना एकदमच कसेतरी होऊ लागले. मग त्यांनी झालेलं सर्व विसरून जाऊन एका नवीन आयुष्याची सुरुवात करायची ठरवली. सेकंड ईनिंग सुरू होत असतानाच पार्टनर कायमचा रिटायर्ड हार्ट

झाला होता. त्यामुळे त्यांनी वृद्धाश्रमात जाण्याचा निर्णय घेतला होता.

बर्वे काकांची गोष्टसुद्धा काही निराळी नव्हती. त्यांचा मुलगा मुंबईत नावाजलेला सर्जन होता. मुंबईला खूप प्रदूषित वातावरण आहे, इथं तुम्हाला त्रास होईल. त्यामुळे तुम्ही निसर्गाच्या सानिध्यात राहायला हवं. हे मोकळं आणि सुटसुटीत कारण देऊन त्याने त्याच्या जन्मदात्यांना वृद्धाश्रमात हाकललं होतं. जे घर घेण्यासाठी गावातलं चांगलं घर विकलं होतं त्याच घरातून आता त्यांना बाहेर काढलं होतं. एका आलीशान गाडीतून त्यांचा मुलगा, सुनबाई आणि नातू त्यांना सोडायला आले होते. बर्वे काकू नेहमी म्हणत, "मी तुम्हाला संगत होते. गावी घर असलेलं कधीही चांगलं. पण तुम्ही ऐकलं नाही." इथं बर्वेकाका निरुत्तर व्हायचे.

महाजन काका, बर्वे दाम्पत्य आणि तिथं असलेल्या सर्वांच्या जवळपास सारख्याच कहाण्या होत्या. आयुष्याची सेकंड ईनिंग अशा प्रकारे व्यतीत करावी लागेल असा कधी त्यांच्यापैकी कुणीच विचार केला नसेल.

प्रार्थना झाली आणि सर्वजण परत पटांगणात जाऊ लागले. आज वांग्याच्या भरताचा बेत असल्याने जोशीकाकांच्या आनंदाला उधाण आले होते. मूळ जळगावचे असलेले जोशीकाका

नोकरीसाठी म्हणून नाशिकला स्थायिक झाले आणि मग एकुलत्या एक मुलीने तिच्या घरात राहायला स्पष्टपणे नकार दिला मग सपत्नीक आले ते ‘निवाऱ्या’त. पटांगणाच्या एका बाजूला वांगी भाजण्याचे काम सुरू होते. तिथे सर्व मंडळी बसली. थंडीचे दिवस असल्याने सहा वाजताच काळोख पडायला सुरुवात झाली होती. आयुष्याच्या सायंकाळी काळोख अनुभवणारी मंडळी वांगी भाजता-भाजता गप्पा मारत बसली होती.

“काय रे जोशी? आज तर मजा आहे राव तुझी. तू तर काय भरीत असल्यावर एकदम शेफ होऊन जातोस.” महाजन काका जोशींना चिडवत म्हणाले.

“हो तर, अरे भाई मी भरीत स्पेशलिस्ट आहे तुला माहीती नाही का ?” जोशीकाका भाजलेलं वांगं विस्तवाच्या बाहेर काढत म्हणाले.

“तो तर आहेस रे तू, मला सांग घरी असताना कोण बनवायचं रे भरीत? म्हणजे तू, की वाहिनी?” बर्वेकाका चेष्टेच्या सुरात म्हणाले.

“हीच बनवायची रे. मृणालिनी सासरी गेली आणि तिने असं केल्यापासून हिने हाय खाल्ली आणि तेव्हापासून किचन मध्ये मी इंटरेस्ट घेतला. काहीतरी विरुंगळा लागतो रे आयुष्यात, नाहीतर

मग कधी कल्पना न केलेली संकटं आली तर आमच्या हिच्यासारखं होतं. वाटलं नव्हतं रे जिला इतकं जपलं लहानपणापासून ती आम्हाला असं करेल.'' जोशीकाका बोलताना फार गंभीर झाले.

''जाऊ देत. आता विसरायचंय ना सगळं? तू ते वांगे बघ बरं झाले का? जाम भूक लागलीये रे आज. त्यात भरीत म्हणजे कळस.'' महाजन काकांनी विषय बदलण्याच्या उद्देशाने गप्पांची गाडी दुसरीकडे वळवली.

रात्री मस्तपैकी भरीत पुरी खाऊन आडवे झाले. तसं बघायला गेलं तर सर्वजण एक मुक्त जीवन जगत होते. पण त्या जगण्याला कुठेतरी चिंतेची कीड लागली होती. सर्वांच्या काळजात कुठेतरी भग्न अशा स्वप्नांची तुटलेली तार होती. तीच त्यांना हळूहळू पोखरत होती. वरकरणी सर्वजण आनंदी आहोत असं भासवत असले तरी सर्वजण एकाच दुःखात होते. अवघड जागेवरच्या दुखण्यासारखे, सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही.

†††

सकाळची वेळ होती. साधारणतः नऊ वाजले होते. हवेत अजूनही बऱ्यापैकी गारवा जाणवत होता. इतक्यात पटांगणात एक इनोव्हा येऊन उभी राहिली. सगळ्यांचे लक्ष तिकडे वेधलं गेलं. अर्थातच त्या गाडीतून त्यांच्यामध्ये सामील व्हायला कुणीतरी आलं होतं. पुणे पासींगची गाडी होती. सामनसुद्धा भरपूर होता. महाजन, बर्वे वगैरे काका मंडळी दुरूनच गंमत बघत होती. गाडीचं मधलं दार उघडलं गेलं. त्यातून एक साधारणतः पासष्ट वगैरे वयाची महिला उतरली. पांढरे केस, कपाळावर गोंदलेल्याचा छोटासा हिरवा ठिपका भ्रुकुटीमध्यच्या अगदी थोडासा वर, हातात एक चांदीची अंगठी सोडली तर काहीही आभूषणं नव्हती. खोल गेलेले डोळे, पाठीला किंचितसा बाक कदाचित संसारगाडा ओढताना आलेला असावा असं चेहऱ्यावरून दिसत होतं. त्या गाडीतून ऊतरल्या आणि तिथंच उभ्या राहिल्या. ड्रायव्हर सीटने एक तरुण मुलगा उतरला. तोंडावळ्याने तो त्यांचाच मुलगा होता कुणीही सांगू शकत होतं. ड्रायव्हरच्या बाजूच्या सीटवर एक स्त्री बसली होती. सगळ्यांत शेवटी ती उतरली.

त्यांना पाहून निवाऱ्याचे मॅनेजर ऑफिस मधून बाहेर आले. त्या तरूणाशी हस्तांदोलन केले आणि मुलांना हाक मारून गाडीवरून सामान उतरवायला लावले. मघाशी ड्रायव्हर सिटच्या बाजूला बसलेली स्त्री त्या तरुणाची बायको होती. कोणत्या बॅग

उतरवायच्या हे ती त्या मुलांना सांगत होती. मॅनेजर त्या तरुणाला काही फॉरमॅलिटी पूर्ण करायला घेऊन गेले.

"जोशीबुवा, हे एवढं एका जणाचं समान असेल?" गंमत पहात असताना बर्वे काकांनी जोशींना विचारलं.

"काय माहिती बुवा, सांगणं कठीण आहे. पण हे एका जणाचं तर मुळीच वाटत नाही. तीन जणांचं नक्की असेल बहुतेक." जोशींनी अंदाज लावला.

"बहुतेक काय म्हणताय जोशी, अहो हे एवढं समान एका वृद्धाश्रमात राहायला येणाऱ्या व्यक्तिचं नाही हे कुणी शेंबडा मुलगासुद्धा सांगेल. अहो, ते दोघं म्हातारीला सोडून कुठेतरी शिफ्ट होणार आहेत. मला तरी असंचं वाटतंय. तुला काय वाटतं महाजन?" बर्वे काकांनी त्यांचं मत मांडलं.

पण महाजन काकांचे लक्ष नव्हतेच यांच्या बोलणायकडे. ते केव्हापासून त्या महिलेकडे बघत होते. जणू काही त्यांची ओळख असावी असं.

"प्राध्यापक महाशय, अहो तुमच्याशी बोलतोय आम्ही. कुठे हरवलात?" जोशी काकांच्या हाकेने महाजन काका भानावर आले.

“अं? मला म्हणताय का? काय झालं?” महाजन काकांना गोंधळल्यागत झालं.

“काही नाही, काय विचारात हरवलास रे? काही प्रॉब्लेम आहे का?” जोशीकाकांनी विचारलं.

“नाही रे. मी ते आपलं थोडं विचारात पडलो होतो. त्या बाईला कुठंतरी पहिल्यासारखं वाटतंय रे. सुधा असेल का ती? पण कॉलेजनंतर कधी बघितलं नहो रे. पदवी प्रदान समारंभाला सुद्धा आली नव्हती ती. कुठे गेली काय माहीत? आता असेल की नाही हेसुद्धा माहिती नाही. छे!!! दुसरी कुणीतरी असेल ती. सुधा तर नक्की नसेल.” महाजन काका त्यांच्याच तंद्रीत बोलत होते.

“ए बाबा, काय झालंय तुला? ताप वगैरे तर आला नाही ना. काय बडबड करतोयस केव्हाची? आणि ही सुधा कोण? आमच्या बोलण्याकडे काही लक्ष आहे की नाही तुझं?” बर्वेकाका महाजन काकांचे खांदे गदगदा हलवत म्हणाले.

“काही नाही रे बर्वे. सांगतो तुला नंतर”, असं म्हणून महाजन काकांनी विषयाला तात्पुरती तिलांजली दिली. मग परत समोर घडणारे दृश्य बघू लागले. सामान जवळपास उतरवून झालं होतं. बर्वेकाकांचा अंदाज बरोबर होता. कारण फक्त तीन बॅग खाली

उतरवल्या गेल्या होत्या. बाकीचा सामान अजून वरंच होता आणि काही गाडीत होता अजून. मुलं सामान घेऊन जायला लागली.

"आई, चल. ऑफिसमध्ये बोलावलंय तुला. काही ठिकाणी सह्या लागताहेत तुझ्या. तू पण चल गं." असं म्हणून तो त्या दोघांना ऑफिसमध्ये घेऊन गेला. दोघांच्या मागून म्हातारी चालू लागली. बाकावर तिघं म्हातारे बसले होते. आसपास कुणीही नव्हते. पण तरीही ते तिघं शांतच बसून होते. अजून एका आईला तिच्या मुलाने नि"वाऱ्यावर" सोडले होते. या गोष्टीची खंत त्यांना लागून राहिली होती. हॉस्पिटल आणि वृद्धाश्रम ही दोनंच ठिकाणं अशी आहेत जिथली संख्या कमी व्हावी असं प्रत्येकाला वाटतं. अगदी जो तिथले भोग भोगतोय त्यांनासुद्धा असंच वाटतं, हे दुःख आपल्या शत्रूला सुद्धा नको.

फॉरमॅलिटी वगैरे पूर्ण करून झाल्या. तिघं आणि त्यांच्यासोबत मॅनेजर असे चौघं ऑफिसच्या बाहेर आले. मॅनेजर त्या तरुण दांपत्याला आत्मविश्वासाने म्हणाले, "तुम्ही काही काळजी करू नका. काकू इथं आनंदात आणि सुरक्षित राहतील. आम्ही सर्वजण चोवीस तास इथेच असतो."

तरुणाने त्याच्या आईच्या पाया पडल्या आणि म्हटला, “काळजी घे आणि काही लागलं तर लगेच फोन कर. मी लवकरात लवकर व्यवस्था करेल.”

“हो, सांगेन मी.” तिच्या डोळ्यातले अश्रु कसेतरी लपवत ती माऊली म्हणाली. तसं बघायला गेलं तर त्या आईला तिच्या मुलाची आणि सुनेची गरज होती. तिला ते दोघं हवे होते. पण तिचा मुलगा आणि सून भौतिक सुखाच्या मागे लागून मानसिक सुख न दिसण्याइतके आंधळे झाले होते.

नवऱ्याने पाया पडले म्हणून नाईलाजाने सुनाबाईला सुद्धा पाया पडावे लागले. मग तिसुद्धा बळेच वाकली.

“चल आई, येतो आम्ही. लवकर निघालो तर लवकर पोहोचू. काळजी घे.” असं म्हणून तो निघालासुद्धा. त्याच्या मागे सुनबाईसुद्धा पतीधर्माचे पालन करत निघाली. दोघं गाडीजवळ आले. दार उघडण्याच्या आधी एकदा त्यांच्या आईकडे पहिलं, तिच्याकडे बघून हात हलवला आणि गाडीत बसले. पाठमोऱ्या जाणाऱ्या गाडीकडे त्यांची आई बघतच राहिली. जसजशी गाडी पुढे जात होती तसं तिला डोळ्यातल्या खाऱ्या पाण्यामुळे धूसर दिसू लागलं. धुराळा उडवत जाणाऱ्या गाडीकडे बघत असताना

गंगा-यमुना वाहायला केव्हा सुरुवात झाली, हे तिचं तिलाच कळलं नाही.

"त्याने अभिनेता बनायला हवं. उत्तम नट होईल तो." जोशीकाका महाजन काकांकडे बघत म्हणाले.

"कुणाची गोष्ट करतोयस तू?" महाजन काकांनी विचारलं.

"कुणाची काय, आता त्याच्या आईचे पाया पडून गेला ना, तो मुलगा. भारी ॲक्टिंग केली मुलाने. वृद्धाश्रमात सोडायला आलेल्या आईचे पाया पडून सांगत होता, काळजी घे म्हणे आणि सुनाबाई तर काय, नवऱ्यापेक्षा सरस नटी हो." जोशीकाका चढया आवाजात बोलत होते.

त्यांचं बोलणं ऐकून महाजन काकांना थोडं अस्वस्थ झाल्यासारखं वाटलं. ते ऑफिसच्या समोर उभं असलेल्या महिलेला न्याहाळत म्हणाले, "जोशी, कधीची कंटाळली असेल ती या दोघांना. त्यामुळे खऱ्या अर्थाने आज तिची सुटका झाली असं म्हटलं तर त्यात काही विशेष नाही. नीट बघ तिच्या डोळयांत. खूप त्रास दिलेला वाटतोय म्हातारीला दोघांनी. डोळयांत आधीसारखं तेज राहिलं नाही रे आता."

जोशी आणि बर्वेकाका महाजन काकांचं बोलणं ऐकून खूप आश्चर्यचकित झाले. आ वासून महाजन काकांकडे दोघं पाहू लागले.

"महाजन, अरे बोलतोयस तरी काय? तुला काही भान आहे का? अरे, फक्त पंधरा मिनिटं झाले फक्त या कुटुंबाला बघून आणि तू काय सांगतोस सुटका झाली वगैरे? तुला काय माहिती त्यांच्या घरात काय झालं? की तू आधीपासून ओळखतोस या कुटुंबाला? महाजन बोल काहीतरी. मघाशीसुद्धा काहीतरी सुधा वगैरे म्हणत होतास. तू ओळखतो का यांना?" जोशीकाका कोंडी फोडत म्हणाले.

"अरे बाबांनो, ही बाई माझ्या ओळखीची वाटतेय. म्हणजे कॉलेजला असताना माझ्या वर्गात एक मुलगी होती सुधा नावाची. ही बाई सुधा तर नाही ना अशी शंका माझ्या मनात येतेय केव्हाची. आम्ही एकाच वर्गात होतो. नंतर ती अचानक गायब झाली ती कधीही न दिसण्यासाठी. मग आज या महिलेला बघून सुधाची आठवण झाली आणि तिच्या कुटुंबाबद्दल म्हणशील तर लोकांच्या डोळ्यात दिसतं रे सगळं. त्या मुलाचे आणि त्याच्या बायकोचे डोळे बघितले होतेस का? काहीही भाव नव्हता त्यांच्यात. अगदी निर्विकार आणि शुष्क होते ते आणि त्यांच्या आईचे डोळे, त्यात

तर अजून भावनेचा ओलावा आहे." महाजन काका एकदमच त्यांच्या मनातलं बोलून गेले. मग तिघं एकमेकांकडे बघत शांत बसले. त्यांच्या नाश्त्याची वेळ होत आली होती, मग निघाले ते हळूहळू.

†††

सायंकाळी प्रार्थनेच्या वेळी मॅनेजर आवर्जून उपस्थित होते. निवाऱ्यात कुणी नवीन आलं की त्यांची ओळख करून द्यायला म्हणून ते सायंकाळी प्रार्थनेला हजर असत. प्रार्थनेची वेळ होत आली तशी सर्वांची पावले मंदिराकडे वळू लागली. या लोकांसाठी प्रार्थना म्हणजे मनाला समजूत घालण्याची एक तऱ्हा होती. प्रार्थना सुरू झाली. नेहमीच्या सवयीप्रमाणे सर्वजण एकामागून एक श्लोक म्हणत होते. या श्लोकांचा अर्थ मात्र सर्वांना माहिती नसावा बहुतेक. पण मनाला तेवढाच एक आधार म्हणून ते म्हणायचे. प्रार्थनेची मात्र एक गंमत असते, प्रार्थना केली की सर्वांना वाटतं आपलं काम संपलं आता चेंडू देवाच्या कोर्टात. पण तसं नसतं हो. असो, उगाच तत्वज्ञान वगैरे. प्रार्थना झाली. सर्वजण खाली बसले, अर्थात ज्यांना बसता येत होतं तेच. बाकीच्यांसाठी बाकं होतीच. सकाळी

आलेल्या त्या बाई बर्वे काकूंसोबत बसल्या होत्या. प्रार्थनेच्या ध्वनीलहरी अजूनही धूप आणि अगरबत्तीच्या धूरासरख्या वायुमंडळात तरंगत होत्या. हिवाळा असल्यामुळे सायंकाळी सहा वाजताच काळोख पडायला सुरुवात झाली होती. ऑफिसमधल्या रेडिओ मधून येणाऱ्या "हे राम"च्या भजनाने सात्विक वातावरणात अजून भर पडली होती.

मॅनेजर उठले आणि बोलू लागले, "नमस्कार, शुभसंध्या. आपल्याला माहितीच असेल आज सकाळी आपल्या परिवारात अजून एका जणाची भर पडली आहे. आपल्या नवीन सदस्यांचं नाव आहे सुधा कदम. त्यांना इथं रुळायला वेळ लागेल. सर्वांनी सहकार्य करा. आपल्या परिवरचा हिस्सा बनवा. सगळ्यांना माहितीये, आता आपल्याला एकमेकांशीवाय कुणी नाही. आयुष्याची सेकंड ईनिंग मस्त जागा. अडचणी कुणाला नसतात? प्रत्येकाला असतात. पण आपण सर्व भाग्यशाली आहोत. इथल्या प्रत्येकाला जगण्याचा प्रचंड अनुभव आहे. त्यामुळे एकही अडचण आली तर ती सोडवायला दहा जण आहेत. काहीही अडचण आली तर माला सांगा. चला, मी माझी बडबड थांबवतो. वेळेवर जेवायला या."

“हा मॅनेजर किती गोड बोलतो रे. नुसती साखर खातो की काय दिवसभर? नुसतं चांगलंच बोलण्याची कला कुठून आली असेल रे याच्यात?” बर्वेकाका म्हणाले.

“हूं, भाग्यशाली आहात म्हणे. अश्वत्थाम्यासारखं जगणं आलंय नशिबी आणि भाग्यवान म्हणे.” जोशीकाकांनी मॅनेजरच्या भाषणावर अभिप्राय दिला.

“अरे जोशी, ते जाऊ दे. तो काय म्हणाला ते ऐकलं का? सुधा कदम.” बर्वेकाका जोशींचं बोलणं तोडत म्हणाले.

“हो. मग काय झालं त्यात. ती तर आपल्या इथली पद्धतच आहे ना, कुणीही नवीन आलं की त्याचा परिचय करून देण्याची. तपशिलात न बोलता.” जोशींना काही समजलं नाही.

“अरे, सुधा, सुधा कदम. सकाळी महाजन बोलला नाही का आपल्याला. त्याच आहेत वाटतं ह्या.” बर्वेंनी जोशींच्या डोक्यात प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला.

“अरे हो की. माझ्या लक्षातच नाही आलं ते. महाजन कुठाय?” जोशी उत्साहाच्या भारत जोरात बोलले.

महाजन काका मंदिरातल्या कृष्णाची मूर्ती न्याहाळत बसले होते. कितीतरी वेळं ते एकटक मूर्ती बघत बसले होते. त्यांच्या मनात विचार येत होते, हा परमात्मा किती शिकवून गेला?

पाच हजार वर्ष झाली या माणसाला अवतार समाप्त करून. तरीही त्याचंच चिंतन करावंस का वाटतं? तितक्यात जोशींच्या आरोळीने महाजन काका भानावर आले. त्यांची विचार समाधी भंग पावली. महाजन काका मागे वळत म्हणाले, "काय म्हणताय जोशी?"

"कुठं हरवलात महाजन? केव्हाच्या हाका मारतोय? जरा इकडे येता का? थोडं बसू बाहेर." जोशींनी महाजनांना बोलावलं.

"चला, आलोच. हं देवा, तूच रे बाबा." असं म्हणत महाजन काका बसल्या जागेवरून उठत म्हणाले.

तिघं हळूहळू मांदिराच्या बाहेर आले. तिथल्या त्यांच्या नेहमीच्या बाकावर बसले. तितक्यात तिथं बर्वे काकू आल्या. "आज तुमची तिघांची मदत लागणार आहे. गप्पा वगैरे झाल्या असतील तर या किचन मध्ये." असं सांगून निघूनसुद्धा गेल्या. बर्वेकाका त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघतच राहिले.

"चला, जायचं का?" महाजन काका म्हणाले.

"लगेच काय आहे तिकडे? जाऊ थोड्या वेळाने. बायका करतील रे स्वैपाक." जोशीकाका म्हणाले.

"जोशी तुला गरजच काय होती तुला भरीत आणि बाकीचं बनवता येतं असं सांगण्याची? तुझ्यामुळे प्रॉब्लेम झालाय सगळा.

माणसांना बायकांची कामं करायला लागतात तुझ्यामुळे." बर्वेकाका चिडून बोलले.

"अरे बाबा, आपल्या मुलांच्या हाताचं खायचं ही आपली लायकी नाही किंबहुना आपल्या नशिबात नाही. स्वतःच्या हाताने करून खाल्लं तर काय फरक पडतो. या वयात सर्वांसोबत काहीतरी करायला मिळतं. त्यामुळे टाईमपास तरी होतो. एरवी आपल्या मनात काय चाललेलं असतं हे वेगळं सांगण्याची गरज नाही. मग थोडं केलं तर काय फरक पडतो." महाजन काका गंभीर होत बोलले.

"अरे एवढं सीरियस का होतोय महाजन? मी बोलायचं म्हणून बोललो रे." बर्वेकाका महाजन काकांकडे थोड्या अपारधिपणाने पाहत म्हणाले.

"हं, मला का बोलावलं ते सांग आता?" महाजन काकांनी मुळ मुद्द्याला हात घातला.

"हत्तीच्या, ज्याच्यासाठी बोलावलं तेच सांगायचं राहून गेलं. अरे, प्रार्थना झाल्यावर तो मॅनेजर काय म्हणत होता ऐकलं का?" जोशीकाकांनी विचारलं.

“हो, चांगलं बोलला मुलगा. थोड्या वेळासाठी पॉसिटीव्ह वाटलं रे त्याचं बोलणं. का? काही चुकीचं बोलला का?” महाजन काका दोघांकडे आळीपाळीने प्रश्नार्थक मुद्रेने बघत बोलले.

“महाजन, त्या आधी काय बोलला ते आठव. जाऊ दे. तू तुझ्या वेगळ्याच तंद्रीत असतोस. मीच सांगतो, त्या नवीन बाईचं नाव काय म्हणला तो, सुधा कदम म्हणे. सकाळी तू म्हणत होतास तीच तर नाही ही बाई?” हे सांगताना जोशींचा उत्साह ओसंडून वाहत होता आणि बर्वेकाका त्याला दुजोरा देत होते.

“हां, बोलला खरं तो. पण ती तीच सुधा असेल का याबद्दल मला शंका आहे आणि असलीही तरी आता काय फरक पडतो. म्हणजे मला म्हणायचं होतं की आपल्याला काय करायचं आहे?” महाजन काका आकाशाकडे बघत म्हणाले. ते दोघांपासून नजर चुकवत होते.

चाणाक्ष बर्वे काकांच्या लक्षात आलं. ते म्हणाले, “आता काय फरक पडतो म्हणजे काय? तू काहीतरी लपवतोयस का आमच्यापासून?”

“मी? छे रे. मी कशाला काही लपवू?” महाजन काका सारवासारव करत म्हणाले. अजूनही ते इकडे तिकडेचं पाहत होते.

“बरं, आता चालायचं का?” जोशीकाका किचनकडे बोट दाखवत म्हणले.

महाजन काकांनी होकारर्थक मन हलवत बर्वे काकांकडे बघितलं. त्यांनी मानेने होकार देताच तिघं उठले आणि ती तीन डब्यांची पासेंजर गाडी किचनच्या दिशेनं चालू लागली. किचनच्या दारावरच जोशीकाकू उभ्या होत्या. त्यांच्यासोबत नवीन सदस्या होत्या. जोशीकाकू त्यांना काहीतरी समजावत होत्या बहुतेक. आज वृद्धाश्रमात पहिलाच दिवस असल्याने थोड्या गोंधळलेल्या वाटत होत्या. माणूस एक दिवस कुठं परक्या गावी जातो तेव्हा गोंधळून जातो आणि आता तर त्यांना त्यांचं उरलेलं आयुष्य या जागेत काढायचं होतं, कितीही मानसिक तयारी झालेली असली तरीही नेमकी परिस्थिती मात्र वेगळी असते. बावरलेल्या नजरेने सर्वदूर बघत होत्या. त्यांची स्थिती त्या भित्र्या आणि घाबरलेल्या सशासारखी झाली होती, ज्याला वाटलं होतं की आपल्या अंगावर आभाळ पडलं आहे. महाजन काकांनी सुधा कदमांकडे पाहिलं आणि ते परत विचारात पडले. इतक्यात बर्वेकाकू आल्या आणि त्यांना एक परात भरून बटाटे आणून दिले. आज तिघांना बटाट्याची साल काढण्याचं काम दिलेलं होतं. आजचं काम तसं कठीण नव्हतं फक्त थोडसं वेळखाऊ होतं. कारण हे तिघं सोबत

असले की यांच्या विविध विषयांवरील गप्पा काही आटोपण्याचं नाव घेत नसत.

बटाट्यांची साल काढण्याचं काम सुरू होतं. पण महाजन काकांचं लक्ष मात्र तिकडे सुधा कदमांकडेच होतं. “पहिल्या दिवशीसुद्धा अशीच गोंधळली होती ती, वर्ग सापडत नव्हता तिला.” असं काहीसं ते पुटपुटले आणि कुणी ऐकलं की काय अशी शंका येऊन काहीच न बोलल्याचा आव आणून उगाचच काहीतरी गुणगुणू लागले आणि चोरट्या नजरेने दोघांकडे बघू लागले. दोघं काकांनी त्यांचं हे वर्तन हेरलं पण जाणूनबुजून त्याच्याकडे दुर्लक्ष केलं.

†††

दुर कुठेतरी पक्ष्यांचा किलबिलाट सुरू होता. दाट धुकं पडलं होतं. गुलाबी थंडी सर्वांना सुस्तावून सोडत होती. सूर्य नेहमीप्रमाणे उगवला होता. नव्हे, तो त्याच्या जागेवर अनादि काळापासून अविचल आणि अविरतपणे होता तसाच होता. एखाद्या चक्रवर्ती सम्राटासारखा. खरं तर पृथ्वी त्याच्याभोवती फिरते आणि आपल्याला वाटतं सूर्य उगवला. पृथ्वी फिरते हे

माहीत असूनही सगळे सूर्य उगवला असंच म्हणतात. त्रिकालबाधित सत्य असूनही ते नाकरतात. आयुष्याचं सुद्धा असंच नाही का? एक वेळ अशी येणार आहे की जेव्हा आपण या जगात नसू, आठवणी असतील पण काही काळाने काळपुरुष त्यांना आपली शिकार बनवेल. हे सर्व सृष्टीला ज्ञात आहे. पण तरीही मायमोहाची लक्तरं काही गळून पडायला तयार नसतात. काही गोष्टी, वस्तु, ठिकाणं यांचा मोह कालपरत्वे सोडलेलाच बरा. नाहीतर ऐन वेळी खूप त्रास होतो. जो या वृद्धाश्रमातल्या लोकांना होत होता. सूर्य उगवला असं म्हटल्यासारखं ते म्हणत होते, आम्ही बरे आहोत असं. पण ती जखम कधीही भरून न येण्यासारखी होती.

"काय रे अण्णा, एकटाच आलास? तो तुझा रूम पार्टनर महाजन नाही आला का?" बर्वे काकांनी किचनमध्ये येत असलेल्या अण्णांना विचारलं.

"रात्री नीट झोपला नाही तो, दर एक-दीड तासाने उठून बसायचा. त्याला विचारलं तर काही बोलायचाच नाही. काही नाही रे, बरा आहे मी असं सांगायचा. आता पहाटे झोपला. झोपू देत. नको उठवायला त्याला." अण्णा बर्वे काकांशेजारी बसत म्हणाले.

"मी कालपासून गंमत बघतोय त्याची. त्या सुधा कदम आल्यापासुन काहीतरी विचारात पडलाय तो. असा भूतकाळात

हरवल्यासारखा वाटतोय. काल बोलतानासुद्धा मध्येच काहीतरी अगम्य बोलायचा. आम्ही विचारलं त्याला आधी. नंतर जाऊ दिलं. त्याला सांगायचं नसेल बहुतेक आम्हाला. तो काहीतरी लपवतोय हे मात्र नक्की.'' जोशीकाका थोडं गंभीर होत म्हणाले.

''खरंय तुझं. त्याला वहिनींची आठवण येत असावी बहुतेक. अण्णा, तुला काय वाटतं? तू कधीचा आहेस त्याच्यासोबत.'' बर्वेकाकांनी अण्णांना प्रश्न केला.

''नाही रे. आम्ही गेल्या वर्षभरपासून सोबत आहोत. पण या विषयावर काही बोलणं नाही झालं कधी. भूतकाळच्या काही गोष्टी विचारल्या तर एवढंच सांगतो, मी विसरलो आता सगळं. मला काहीही आठवत नाही. हे माझं नवीन आयुष्य आहे. याला काही कीड लगायला नको.'' अण्णा खिडकीतून येणाऱ्या सूर्यकिरणांच्या तिरीपीकडे बघत म्हणाले.

''त्याच्या मनाचा ठाव लागणं कठीण आहे रे. तो प्राध्यापक होता. विद्वान माणूस. त्याचं दुःख तो आपल्यासमोर कसं आणेल?'' जोशीकाका म्हणाले.

''त्याच्या मनातलं काढावं लागेल. जे असेल ते. नाहीतर तेच घोकत राहील तो बिचारा,'' अण्णा दरवाज्याकडे बघत म्हणाले. ते महाजन काकांची वाट बघत होते.

"हो, बरोबर आहे तुझं. यावर विचार करायला हवा." बर्वेकाका म्हणाले.

असं बोलणं सुरू असतानाच तिथे महाजन आले. जोशींशेजारी बसताना एकदा घड्याळात पहिलं आणि म्हणाले, "भरपूर उशीर झाला रे मला आज."

"चालतं रे एखाद्या दिवशी. पहाटेच्या थंडीत झोपण्याची एक वेगळीच मजा असते बघ." जोशींनी महाजन काकांना प्रत्यूत्तर दिलं. कारण बर्वेकाका पोह्यांमधल्या मिरच्या अण्णांच्या डिशमध्ये टाकत होते. हा मिरच्यांचा व्यापार सुरू असताना महाजन आले याच्याकडे त्या दोघांचं लक्षच नव्हतं.

नाश्ता वगैरे झाल्यावर चौघंजण बाहेर पटांगणात आले. कोवळं ऊन पडलं होतं. थंडीच्या दिवसांत असं कोवळया उन्हात फिरायला कुणाला नाही आवडणार? एका ठिकाणी बसण्यापेक्षा ऊन खाल्लेलं बरं, असा विचार करून ते फिरायला लागले. आधी कुणीच काहीच बोलत नव्हतं. मग जोशींनी कोंडी फोडत सुरुवात केली, "महाजन, तुला रात्री झोप नाही आली म्हणे? अण्णा संगत होता."

“हो, एवढी विशेष झोप लागली नाही. आता म्हातारपणात होतं तसं. कुत्र्यासारखी झोप. झाडाचं पान पडलं तरी जाग येते.” महाजन काका मनातलं बोलून गेले.

“महाजन तुला आम्ही गेल्या आठ महिन्यांपासून ओळखतोय. तू आमच्यापसुन काहीतरी लपवतोय. आम्ही तुझ्याएवढे शिकलेले नसू. पण माणूस अस्वस्थ आहे हे ओळखता येतं आम्हाला. कालपासून बघतोय. आता खरं काय ते सांग बघू,” जोशी स्पष्टपणे बोलले.

जोशींकडून झालेल्या प्रश्नाच्या भडिमाराने महाजन एकदम दचकलेच. चलता चलता एकदम थांबले आणि आळीपाळीने तिघांकडे बघू लागले. काल आपण मनातलं बोलून गेल्यावर सावरण्याचा प्रयत्न केला तो यशस्वी झाला असं त्यांना वाटलं होतं पण तो पुरता फासला होता हे त्यांच्या आता लक्षात आलं होतं. खरं सांगण्याशिवाय गत्यंतर नाही हे त्यांना उमगले होते. त्यांनी उसासा घेऊन बोलायला सुरूवात केली. “तुम्हाला ऐकायचं आहे ना, मग इथं नाही.” महाजन काकांच्या आज्ञेनुसार तिघंजण त्यांच्या मागोमाग चालू लागले. खोलीत पोहोचेपर्यंत  कुणीही काहीही बोललं नाही. खोलीत गेल्यावर महाजन काकांनी परत उसासा सोडला, आपला भूतकाळ सांगण्यासाठी ते त्यांच्या मनाची तयारी

करत होते. महाजन काका त्यांच्या पलंगावर बसले. त्यांच्या बाजूला जोशीकाका, अण्णांच्या पलंगावर बर्वेकाका बसले आणि अण्णा खुर्चीवर बसले. अजूनही कुणीच काही बोलत नव्हते. सर्वांच्या नजरा महाजन काकांवर खिळल्या होत्या. आळीपाळीने महाजन तिघांकडे बघत होते. शेवटी त्यांनी बोलायला सुरुवात केली.

“तर, कालपासून मी इतका अस्वस्थ आणि हरवलेला का वाटतोय हे जाणून घ्यायचं आहे ना तुम्हाला? ऐका तर मग, काल आलेली सुधा ही कॉलेजला असताना माझ्या वर्गात होती. काल तिला पाहिलं आणि मी क्षणभर थबकलोच. कारण, एम. ए. च्या शेवटच्या पेपरला बघितलं होतं तिला. नंतर खूप वाट पहिली पण ती आलीच नाही. आपलं पहिलं प्रेम जवळपास चाळीस वर्षांनी पाहिल्यावर कसं वाटेल तुम्हाला? मोडलेली स्वप्न आणि त्यांचं एकमेव कारण असलेली व्यक्ती जेव्हा अचानक भेटते तेव्हा मनाची काय स्थिती होते हे तुम्हाला नाही कळणार. कॉलेजचे ते सोनेरी दिवस काल श्रवणाच्या झडीसारखे माझ्यासमोर बरसत होते. त्यांच्यात मी चिंब भिजून गेलो होतो. रात्रीसुद्धा त्या आठवणींनी मला रातकिड्यांसारखं किर्र-किर्र करून भंडावून सोडलं होतं. आधी मला वाटलं की दुसरं कुणीतरी असेल किंवा आपल्या

दृष्टीचा भ्रम असेल पण सायंकाळी किचनमध्ये पक्की खात्री पटली.’’

महाजन काकांचं बोलणं ऐकून सर्वजण विजेचा शॉक लागल्यासारखे स्तब्ध झाले. काही वेळ अशाच स्मशान शांततेत गेले. महाजन काका आळीपाळीने तिघांकडे बघत होते. पण सर्वजण महाजन काकांच्या नजरेला नजर देण्याचं टाळत होते. महाजन काकांनी परत बोलणं सुरू केलं. आपल्या जीवनाच्या पुस्तकाचं एकेक पान ते आता वाचून दाखवणार होते.

मी पहिल्यांदाच पुण्याला आलो होतो. कॉलेजचा पहिलाच दिवस होता. हॉस्टेलमध्ये जागा नसल्यामुळे भाड्याने खोली घ्यावी लागली होती. पाहिल्याच दिवशी उशीर नको म्हणून मी अर्धा तास लवकर जाऊन पोहोचलो. तिथं अगदी सिनेमात बघितल्यासारखं वातावरण होतं. स्त्री-पुरुष समानता एकदम. मला ते पाहून धडकीच भरली. कुण्या एका मुलीशी बोलण्याचा काही प्रसंग मला माझ्या उभ्या आयुष्यात झालेला आठवत नव्हता आणि इथेतर मुलं मुली एकदम बिनधास्तपणे गप्पा वगैरे मारत होते. भल्यामोठ्या कॉलेजमध्ये वर्ग शोधत असताना माझी तारांबळ उडत होती. संपूर्ण कॉलेज फिरलो पण मला वर्ग काही सापडला नाही. शेवटी मध्यवर्ती कार्यालयाच्या समोर उभा राहिलो. तिथं

आजूबाजूला कुणी ओळखीचं दिसतंय का ते पाहू लागलो. ॲडमिशनच्या वेळी तीन-चार मुलांचे चेहरे चांगले पाठ करून ठेवले होते. पण तेसुद्धा काही दिसत नव्हते. इतक्यात एक माध्यम सावळ्या वर्णाची मुलगी माझ्यासामोर उभी राहिली. घाबरलेली आणि बावरलेली. केसांत एक लालभडक गुलाबाचे फूल मळले होते. हातात दोन मोठी रजिस्टर होती. तिसुद्धा माझ्यासारखीच गोंधळलेली वाटत होती. आमची दोघांची नजरानजर झाली. तिने एकदम घाईत विचारलं, "बी. ए. एफ. वाय. चा वर्ग कुठं आहे माहितीये का तुम्हाला?"

मी याआधी कुणा मुलीशी बोललो नसल्याने गोंधळून गेलो. माझ्या घशाला कोरड पडू लागली. छातीत धडधड वाढत होती. काय बोलावं ते सुचत नव्हतं. "म, मला नाही माहिती. मीसुद्धा तोच वर्ग शोधतोय." मी कसाबसा उच्चारलो.

†††

"आपण दोघं मिळून शोधूयात का?" तिने मला असं विचारलं तेव्हा मी जास्तच घाबरलो. तिथं आमच्या गावाचा एक

मुलगा शेवटच्या वर्षाला होता. त्याने जर पाहिल्याच दिवशी मला मुलीसोबत पाहिलं असतं तर मला घरात काय गावातसुद्धा घेतलं नसतं. मी त्या आपत्तीचं चिंतन करत होतो आणि पहिलाच दिवस असल्याने उशिरा जाणंसुद्धा योग्य नव्हतं. मी द्विधा मनःस्थितीत होतो. मला असं बघून तीच म्हणाली, “चला, लवकर वर्ग शोधूयात नाहीतर पाहिल्याच दिवशी बॅड इंप्रेशन पडेल.”

मी तिच्या मागोमाग जाऊ लागलो. ती बिनधास्तपणे रस्त्यात दिसणाऱ्या कुणालाही वर्ग विचारू लागली. मागे वळून मला म्हणाली, “चला लवकर. कुठे हरवलात?”

आम्ही आता सोबतच चालू लागलो. मला ते कसंतरीच वाटत होतं. एका वर्गासामोर ती मला घेऊन आली आणि म्हणाली, “हाच आपला वर्ग.”

आमचं नशीब चांगलं म्हणून लेक्चर सुरू झालं नव्हतं. मी मुलांमध्ये जागा मिळेल त्या बाकावर जाऊन बसलो आणि तीसुद्धा मुलींमध्ये बसली कुठंतरी. इतक्यात सर आले आणि लेक्चर सुरू झालं. शेवटी हजेरी घेताना आम्हाला एकमेकांचं नाव समजलं, तीच नाव होतं सुधा साठे आणि विशेष म्हणजे माझी हजेरी झाल्यावर मी सहज मागे वळून पहिलं तर ती आधीपासूनच

माझ्याकडे पाहत होती आणि स्मितहास्य वगैरे करत होती. मी चोरून इकडेतिकडे बघितलं. आम्हाला कुणीही बघत नव्हतं.

एवढं बोलून महाजन काका थांबले. पुढे ऐकण्याची उत्सुकता सर्वांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होती.

"मग पुढे काय झालं महाजन? आज वेळ मिळालाय तर सांगून टाक सगळं. तुझा भार हलका होईल आणि आमची करमणूक होईल. काय बर्वे बरोबर ना?" जोशी हसतच म्हणाले.

"अगदी बरोबर." बर्वेंनी जोशींना दुजोरा दिला.

"अशी मजा नका घेऊ त्याची. तो सांगणार नाही पुढचं." अण्णा म्हणाले.

या वाक्यावर सर्वजण मनसोक्त हसू लागले. महाजन आधी लटक्या रागाने त्यांच्याकडे पाहू लागले. पण जसजसा हसण्याच्या आवाज वाढू लागला तसा त्यांचा खोटा राग स्मितहास्यात बदलला. कितीतरी दिवसांनी ते असे हसत होते. महाजन काकांचा चेहरा आता खुलला होता. काल दिसणारी काळजीची करडी छटा जाऊन त्या जागी प्रसन्नता येणार होती. त्यांनी पुढे सांगायला सुरुवात केली,

त्या दिवशी कॉलेज संपल्यावर खरं तर मला सुधाला धन्यवाद द्यायचे होते. पण कॉलेज संपल्यावर ती कुठे गायब झाली

काय माहीत? माझं मन थोडं खट्टू झालं. दुसऱ्या दिवशी मी कालसारखा लवकर आलो आणि सुधाने दाखवलेल्या वर्गात जाऊन बसलो. अजून कुणीच आलं नव्हतं. मी खिडकीतून बाहेरची गंमत बघू लागलो. बाहेर रस्त्यावर वाहनांची मुंग्यांसारखी रांग लागली होती. इतक्यात एक मंद सुगंध येऊ लागला. पण मी इतक्या गाड्या पहिल्यांदाच बघत असल्याने त्या सुगंधाकडे दुर्लक्ष केलं. हळूहळू तो सुगंध आता तीव्र प्रमाणात येऊ लागला होता. त्यामुळे मी जरा मान फिरवली आणि बघतो तर काय सुधा साठे कालच्याच वेशात येऊन माझ्याजवळ उभी राहिली होती. ती काल जशी दिसत होती तशीच आजही दिसत होती. यत्किंचितही फरक पडला नव्हता. तिला असं अचानक इतक्या जवळ बघून माझी भांबेरी उडाली. मला गोंधळलेला बघून ती थोडी हसली आणि म्हणाली, “आज का लवकर आलात अरुण महाजन? आज तर वर्ग माहिती होता ना?”

“तुम्हाला धन्यवाद द्यायचे होते. त्यासाठीच.” माझ्या तोंडातून अचानक असे शब्द बाहेर पडले.

“मला धन्यवाद, ते बरं कशासाठी?” तिने विचारलं.

“काल तुम्ही मला खूप मदत केली. नाहीतर मला वर्ग सापडलाच नसता. अर्ध्या तासापासून शोधत होतो हो मी.” मला बोलताना आता आत्मविश्वास जाणवत होता.

“त्यात काय एवढं. मला कुठं माहिती होता वर्ग?” ती सहजपणे बोलून गेली.

पुण्यात हळूहळू मन रमत होते. नाही म्हटलं तरी अधूनमधून गावाची थोडी आठवण येत होती. पण शहरतल्या झगमगाटाकडे बघितलं की ती तात्पुरती नाहीशी व्हायची.

त्या दिवशी रविवार होता. कॉलेजमधली पहिलीच सुट्टी. मला काही पुस्तकं घ्यायची होती. मी सायकलवर अप्पा बळवंत चौकात शोधकार्य सुरू केलं. नवीन पुस्तकांच्या किमती दिवसा तारे दाखवत होत्या. जुनी पुस्तकं त्यामनाने स्वस्त होती, पण नंतर तिसुद्धा कुणी घेतली नसती. काय करावं हे सुचत नव्हतं. रस्त्याच्या एका बाजूला उभं राहून मी गाड्यांची गर्दी बघत होतो. तितक्यात मला सायकलवर एक मुलगी जाताना दिसली. अंगाढंगावरुन ती सुधाच असावी असं मला वाटलं. पण सुधा असली तरी काय होणार होतं? तिला पुस्तकांचं विचारवं असं मला वाटलं पण असं भर रस्त्यात हाक कशी मारणार? मुलगा असता तर गोष्ट वेगळी होती. शिवाय इतक्या मोठयाने मुलीला आरोळी मारली असती तर

रस्त्यावरची सगळी जनता अचंबित होऊन माझ्याकडे बघत राहिली असती. इतकं सगळं होऊनसुद्धा ती सुधा नसती तर किती पोपट झाला असता माझा. त्यामुळे तो विचार मी सोडून दिला. दगडूशेठ गणपतीजवळ सायकल लावली होती. ती घेतली आणि निघालो.

दगडूशेठला वळसा घालून निघालो, तिथं पोलिस स्टेशन होतं. मी सरळ केसरी वाड्याकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलो तर पुढच्या चौकात सुधा दिसली. तिच्या हातात जेवणाचा डबा होता. ह्या सुधाने आज साडी घातली होती. आज डोक्यात फूल नव्हते. म्हणजे मघाशी बघितलेली मुलगी सुधा नव्हती याची खात्री झाली. माझा पोपट होऊ न दिल्याबद्दल मी देवाचे मनोमन आभार मानले. मी नेहमीप्रमाणे मला शांत बघून तीनेच सुरुवात केली, “आज इकडे कुणीकडे?”

“पुस्तकं घ्यायला आलो होतो.” मी अडखळत बोललो

“पण ती तर काही दिसत नाहीत तुमच्याजवळ.” तिने माझी रिकामी पिशवी पाहून विचारले.

“मी घेणार होतो, पण भरपूर महाग आहेत. त्यामुळे काय करावं ते नेमकं सुचत नाही.” मी सरळ सांगून टाकलं.

“तुम्ही कुठल्या संस्थानाचे राजकुमार आहात?” तिचं असं वाक्य ऐकुन मी पार उडालोच. मी नेहमीपेक्षा जास्त गोंधळलेला बघून ती हसायला लागली आणि म्हणाली, “म्हणजे मला असं म्हणायचं होतं की कॉलेजमध्ये लायब्ररी असताना तुम्ही पुस्तकं विकत का घेताय? लायब्ररी आपल्यासाठीच आहे. आपण तिचा पुर्णपणे लाभ घ्यायला हवा. नवीन पुस्तकं घ्यायला गेलो तर कर्ज काढावं लागेल.”

“माफ करा. मला खरंच माहिती नव्हतं. मला उद्या सांगाल का प्लीज?” मी विनवणीच्या सुरात म्हणालो.

“हो सांगेल ना, नक्की सांगेल. आता मला निघायला हवं. बाबांना डबा द्यायचा आहे.” असं म्हणून ती निघालीसुद्धा. मी तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघतच राहिलो. त्या दिवशी मला दोन गोष्टींचं खूप वाईट वाटलं, एक म्हणजे आपल्याला काहीच माहिती नाही आणि दुसरं म्हणजे सुधा मला किती बावळट आणि मूर्ख समजत असेल. पण एका गोष्टीने मला खूप वेळ विचार करायला लावला, ती मला मजेत का असेना राजकुमार म्हणाली होती. मी आरशात पहिले आणि जोरजोरात हसू लागलो. दिवसभर सुधाविषयीच्या विचाराने रविवार कसा गेला ते कळलंच नाही.

सोमवारी कॉलेजला गेलो. सुधाची वाट बघितली. ती काही आली नव्हती. माझं पुस्तकं घेण्याचं काम एक दिवस लांबलं. दुसऱ्या दिवशी ती आली होती. जेवणाच्या सुटीत मी कॅन्टिन मध्ये बसलो होतो. कुणाशी अशी विशेष ओळख झाली नव्हती. त्यामुळे एकटाच होतो. मी विचारांच्या तंद्रीत असताना सुधा माझ्याजवळ आली आणि थेट माझ्या समोरच बसत म्हणली, "काय झालं का जेवण?"

"अं, हो झालं ना. तुमचं?" सुधा आल्यावर जसा गोंधळायचो तसाच गोंधळत बोललो.

"हो, झालं ना. काल मला थोडं बरं वाटत नव्हतं. त्यामुळे मी काल येऊ शकली नाही. माफ करा, माझ्यामुळे तुमचा कालचा अभ्यास बुडला असेल." सुधाने काल न येण्याचं कारण देत खेद वगैरे व्यक्त केला.

"छे, मी अजून सुरुवात नाही केली अभ्यासाला. आतातर कुठे मन रामयला लागलं पुण्यात." मी खरं ते सांगितलं.

†††

“चला, आपण लायब्ररीत जाऊ. मी सांगते तुम्हाला सर्व.” असं म्हणून ती उठली आणि निघाली. मला लायब्ररी माहिती नसल्यामुळे मी तिच्या मागे जाणं भाग होतं. चालता चालता तिच्यासोबत केव्हा चालायला लागलो हे कळलं देखील नाही. तिच्यासोबत असं शांतपणे चालताना कसंतरीच वाटत होतं आणि पहिल्या दिवसापासून ती मला मदत करत होती. आतसुद्धा तिचं काम नसताना माझी मदत म्हणून ती येत होती. त्यामुळे माणुसकीच्या नात्याने काहीतरी बोलणं भाग होतं. म्हणून मी विचारलं, “तुमचे बाबा कुठं असतात? काल तुम्ही डबा द्यायला गेला होतात म्हणून विचारलं.”

“बाबा पोलिसांत आहेत. दगडूशेठ गणपतीच्या बाजूला जिथं पोलिस चौकी आहे ना, तिथं इन्स्पेक्टर आहेत ते.” तिच्या बोलण्यात एक अभिमानाची झलक होती.

तिचं हे बोलणं ऐकून मला दरारून घाम फुटला. तिच्या न पाहिलेल्या बाबांची मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली. कमरेला लावलेलं पिस्तूल दाखवून ते माला घाबरवताहेत असं माला वाटू लागलं. मला घाबरलेला पाहून ते जोरात हसत आहेत असा मला भास झाला. मी भानावर आलो तेव्हा आम्ही लायब्ररीत होतो. सर्व सोपस्कार पार पडून सुधाने मला नियम, अटी वगैरे

उत्साहात समजावून सांगितल्या. मला माझीच लाज वाटू लागली. इतकी पुस्तकं बघून मला चक्कर येणं बाकी होतं. या मुलीचे आभार कसे मानावे हे मला समजत नव्हते, काही ओळख नसताना ती मला इतकी मदत करत होती. शेवटी न राहवून मी म्हणालो, "मला तुम्हाला काही सांगायचं आहे."

"बोला ना."

"तुम्ही माझी इतकी मदत का करत आहात? आपली काही जास्त ओळख नाही. तरीही तुम्ही अगदी उत्साहात मदत करताय. त्यासाठी मला तुम्हाला धन्यवाद द्यायचे आहेत. तुम्हाला काही त्रास नसेल तर तुम्ही माझ्यासोबत कॉफी घ्यायला याल का?" मी एका दमात बोलून टाकलं.

"छे हो, धन्यवाद कशासाठी? आणि मला आवडतं मदत करायला. त्यामुळे मी काही उपकार वगैरे करत नाहीये तुमच्यावर. चला कॉफीला."

अर्जुनाच्या गांडीवातून धडाधड बाण सुटवेत तसे तिच्या तोंडातून वाक्य निघू लागले. मला फक्त 'चला कॉफीला' एवढंच ऐकू आलं.

"पण लेक्चर?"

“आता उशीर झालायं. असंही आपल्याला वर्गात घेणार नाही. त्यापेक्षा चला कॅन्टिनला.” असं म्हणत ती निघाली. आम्ही कॅन्टिनला पोहोचलो, जवळपास सर्व कॅन्टिन रिकामं होतं. मी दोन कॉफी घेऊन आलो. काय बोलावं? हा प्रश्न नेहमीप्रमाणे माझ्यासमोर होताच.

“तुम्ही नेहमी कॉफी घेतात का?” तिने वाफाळलेल्या कॉफीचा कप हातात घेत विचारलं.

“नाही, मी घरी असताना दूध घ्यायचो. घरचंच होतं ना. मी अजून चहाची चव घेतली नाही आणि आता इथं दूध वगैरे घेणं म्हणजे कसं वाटलं असतं ते. म्हणून कॉफी.” मी संदर्भासहित स्पष्टीकरण दिलं.

“छोट्याश्या गोष्टीसाठी खूप विचार करतात तुम्ही.” तिने टिप्पणी दिली.

या वाक्याला काय बोलावं ते माला सुचत नव्हतं. मग उगाच काहीतरी बोलायचं म्हणून मी म्हणालो, “तुमच्यापासून सांभाळून राहायला लागेल बुवा. तुमचे बाबा पोलिसात आहेत.”

माझ्या या वाक्यावर ती खळखळून हसायला लागली आणि म्हणाली, “असं काही नाही. तुम्ही फार मजेशीर बोलतात.”

मला माझाच अभिमान वगैरे वाटला. कॉफी संपली. आम्ही निघालो.

महाजन काकांनी मनटातील घड्याळाकडे बघितलं. दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. त्यांनी हातानेच जेवायला चला अशी खूण केली तेव्हा मंडळी भानावर आली. एकेक जण महाजन काकांच्या खोलीतून बाहेर पडू लागला. मग ते चौघं किचनकडे वळले. चलता चालता परत त्यांच्यात गप्पा सुरू झाल्या. जोशीकाका म्हणले, “आज दुपारची झोप नाही. महाजन चरित्र ऐकिन म्हणतो.”

“अरे दुपारची काय, रात्रीची झोपसुद्धा रद्द. चांगली मैफिल जमवू रात्री.” बर्वे काकांनी जोरदार समर्थन दिले. मग हास्यविनोद करत जेवण वगैरे झाले. परत स्वारी महाजन काकांच्या खोलीत आली. खोलीत आल्यावर जोशींनी महाजन काकांना थेट प्रश्न केला, “महाजन, मला वाटतं काळाच्या ओघात ती तुला विसरून गेली बहुतेक. मग तू स्वतःहून ओळख का देत नाहीस. आता ती तुझ्या नजरेसमोरच असते. प्रार्थनेच्या वेळी किंवा इतर कोणत्याही वेळी तू बोलू शकतोस. तेवढंच बरं वाटेल रे तुला.”

महाजन काकांनी शांतपणे जोशींचं बोलणं ऐकून घेतलं आणि काही न बोलतच पुढे सुरुवात केली,

असेच दिवस उलटत होते. सुधाशी नंतर काही बोलण्याचा योग आला नाही. पण दररोज नजारानजर झाल्यावर स्मितहास्य व्हायचं. तेवढंचं बरं वाटायचं. ज्या दिवशी ती नसायची त्या दिवशी थोडं चुकल्यासारखं वाटायचं. मग परीक्षा आली, मनासारखा अभ्यास झाला नव्हता. माझ्या खोलीत भुताटकी होती बहुतेक. इतकी प्रचंड झोप यायची की काय सांगू. म्हणजे दिवसभर झोपलं तरी रात्री झोप मी म्हणायची. हे जर असंच सुरू राहिलं तर काही खरं नाही हे माझ्या लक्षात आलं. अभ्यासला लायब्ररी हा एकच चांगला पर्याय आहे हे मी ताडलं. मग दुसऱ्या दिवसापासूनच लायब्ररीत अभ्यासाला जायचं हे नक्की केलं. काही दिवस लायब्ररीत अभ्यास केला. ठरवलं त्यापेक्षा जास्त अभ्यास होत होता. मला माझीच शाबासकी द्यावीशी वाटली. एके दिवशी सुधा पुस्तकं घ्यायला आली होती आणि मीसुद्धा रॅकमध्ये पुस्तक शोधत होतो. माझ्याकडे नजर जाताच ती हसली आणि म्हणाली, “जोरात अभ्यास चाललाय वाटत?”

आम्ही लायब्ररीत होतो याचं भान तिला नव्हतं. मी तिला खुणेनेच म्हटलो. आपण बाहेर बोलूयात. आम्ही बाहेर आलो. यावेळी मीच सुरुवात केली, “तुमचा भरपूर झाला असेल अभ्यास.”

“कशाचं काय. सुरुवातसुद्धा नाही केली अजून. तुमचं मस्त आहे बुवा. खोलीत एकटे असतात. डिस्टर्ब करायला कुणीच नसतं.” तिने तिचे विचार मांडले.

“नाही, रूमवर असताना प्राचंड झोप येते. काहीतरी भुताटकी आहे बहुतेक. त्यामुळे इथं लायब्ररीत येतो अभ्यासाला.” मी सांगितलं.

माझ्या बोलण्यावर ती हसू लागली. माझ्या बोलण्यावरचं तिचं हसणं म्हणजे अगदी मनापासून असायचं. खिल्ली उडवणारं किंवा खेचणारं नव्हे. ती विनंतीच्या स्वरुपात म्हणाली, “माझा घरी काहीच अभ्यास होत नाही हो. मीसुद्धा लायब्ररीत अभ्यास करण्याचा विचार करते आहे. आपण सोबत अभ्यास केला तर चालेल का तुम्हाला? माझ्या काही अडचणी आहेत, त्यासुद्धा सोडवायला तुमची मदत होईल.”

तीचं हे अखंड बोलणं ऐकून मी म्हणालो, “तुम्ही ही वाक्यं पाठ करून आला होतात का? म्हणजे एकदम न अडखळता बोललात म्हणून विचारलं.”

माझ्या ह्या बोलण्यावर ती खळखळून हसू लागली आणि हसतच म्हणाली, “काय मजा घेताय आज गरिबाची.”

“मी कुठं मजा घेतोय. मला जे वाटलं ते बोललो. तुम्हाला सोबत अभ्यासाची इच्छा असेल तर मला काही हरकत नाही.” मी म्हणालो.

“ठीक आहे तर मग, उद्यापासूनच सुरू करुयात.” तिनेच ठरवलं.

“चालेल,” मी अनुमती दिली.

“एक सांगू का? संगतेच, तुमच्याशी बोललं की छान वाटतं. म्हणजे मस्त वाटतं.” असं बोलून माझ्या प्रत्युत्तराची वाट न बघता ती निघालीसुद्धा. तिच्या बोलण्याचं मला गालातल्या गालात हसू आलं. त्या दिवशी अभ्यास झाला नाही. दुसऱ्या दिवसाची वाट बघण्यात तो दिवस वाया गेला.

दुसऱ्या दिवशी मी खूप उत्साहात लायब्ररीला गेलो. त्या दिवशी थोडी नीट तयारी केली होती. तशी रोज करायचो, पण घाईत. लायब्ररीत माझ्या नेहमीच्या जागेवर बसलो. बाजूच्या जागेवर रुमाल टाकला आणि सुधाची जागा रिझर्व्ह करून ठेवली. पुस्तक उघडून बसलो पण अभ्यासाची इच्छा होत नव्हती. अर्ध्या तासाने सुधा आली तेव्हा थोडं बरं वाटलं. येताच तिने सुरुवात केली, “सॉरी, मला उशीर झाला.”

“नाही, तसं काही नाही. मीसुद्धा आताच आलो. पण तुमच्याशिवाय अभ्यासला सुरुवात कशी करणार?” मी म्हणालो. तिने स्मितहास्य केलं. मग परत मी म्हणालो, “तुम्ही माझ्या रुमालावर बसलात. तो द्याल का प्लीज?”

क्षणभर तिला समजलंच नाही. मग खुर्चीवरून उठत माझा रुमाल मला दिला आणि हसू लागली. भरपूर हसल्यावर ती म्हणाली, “तो रुमाल तिथं का ठेवला होता?”

†††

“तुमची जागा रिझर्व्ह करून ठेवली होती.” माझ्या या वाक्यानंतर ती जास्तच हसू लागली. मग आम्ही अभ्यासाला सुरुवात केली. त्या दिवशी तिने माला भरपूर अडचणी विचारल्या. माला शक्य तेवढ्या सोडवल्या. त्या दिवशी माझा बऱ्यापैकी अभ्यास झाला आणि तिचा भरपूर. मी खोलीवर येईपर्यंत, आल्यावर, झोपताना आणि झोपेतसुद्धा माझ्या मनात सुधाचेच विचार सुरू होते. तो रुमाल मी सांभाळून पेटीत ठेऊन दिला.

असाच अभ्यास होत राहिला. परीक्षा झाली. दोघं उत्तम गुणांनी पास झालो. रिझल्ट लागला तेव्हा ती खूप आनंदात माझ्याकडे आली आणि म्हणाली, "अभिनंदन."

मीसुद्धा तिला तेवढ्याच आनंदात म्हणालो, "तुमचंसुद्धा."

"तुमचीच कृपा. तुम्ही लायब्ररीत मदत केली नसती तर काही खरं नव्हतं माझं. खरंच धन्यवाद!!!" ती खूप अत्यानंदात होती.

"नाही, तसं काही नाही. उलट जर तुम्ही मला लायब्ररी दाखवली नसती तर मी कर्ज काढून पुस्तकं घेतली असती आणि मग हप्तेच भरत बसलो असतो." माझ्या ह्या बोलण्यावर ती खूप हसायला लागली. भरपूर हसून झाल्यावर ती म्हणाली, "चला तुम्हाला धन्यवाद म्हणून कॉफी घेऊ."

आम्ही मस्तपैकी कॉफी घेतली. असेच दिवस जात होते. हळूहळू दुसरं वर्ष संपलं. मग तिसरं. या तीन वर्षांत आमची जवळीक खूप वाढली.

एकमेकांना बघितल्याशिवाय आमचा दिवस जात नसे. त्यामुळे आजारी असतांनासुद्धा ती कॉलेजला यायची. खरंतर आम्ही एकमेकांवर प्रेम करायला लागलो होतो. आमच्या नकळत. पण आम्ही तसं कधी बोललोच नाही एकमेकांना. पेपराआधी

लायब्ररीत अभ्यास करण्याचं सत्र आम्ही शेवटपर्यन्त सुरू ठेवलं. बी. ए. चा शेवटचा पेपर होता. अपेक्षेप्रमाणे चांगला गेला. पेपर झाल्यावर ती मला भेटली. म्हटली, “चला कॉफीला.”

त्या दिवशी ती शांतच होती. मला ती शांतता अस्वस्थ करत होती. आज तिला मनातलं सांगू असा विचार केला होता. कॉफीच्या निमित्ताने आयतीच संधी चालून आली होती. त्यामुळे बोलावं की नाही या विचारात मी होतो. बोलल्यानंतर जर तिला वाईट वाटलं असतं तर मात्र मी तिच्या नजरेतून कायमचा उतरलो असतो. तिसुद्धा तसाच काहीसा विचार करत असावी बहुतेक. मी तिच्या डोळ्यांत पहिलं. ती लगेच मान फिरवून उगाचच इकडे तिकडे पाहायला लागली. कॅन्टीनमध्ये नेहमीप्रमाणे वर्दळ होती पण आमच्यातली शांतता मला क्षणाक्षणाला अजून जास्त अस्वस्थ करत होती. शेवटी न राहवून मीच म्हटलं, “काय मग आता एम. ए. करणार की संसार?”

माझ्या ह्या वाक्याने ती दचकलीच. मी असं काही विचारेल याची तिला कल्पना नसावी बहुतेक. कपातून वर येणाऱ्या कॉफीच्या वाफांकडे बघत ती म्हणाली, “ठरलं नाही अजून. एम. ए. चं आणि संसाराचं पण. पण संसार करेल तर शक्यतो वागण्या-बोलण्यात आणि दिसण्यात तुमच्यासारख्या माणसासोबतच.”

शेवटचं वाक्य ती इतकं हळू बोलली की तीच तिलाच ऐकू गेलं नसेल. पण मी मात्र ऐकलं. मी आतापर्यन्त तिच्यासोबत घालवलेले सर्व क्षण आठवून म्हणालो, “माझ्यासारख्या माणसासोबत की माझ्यासोबत?”

हे ऐकून मात्र ती लाजून चूर झाली. गालातल्या गालात अतिशय लघवी हास्य करत ती वर बघत म्हणाली, “विचार करावा लागेल.”

“करा मग लवकर. मी उद्या निघतोय.” माझ्या ह्या गुगलीने ती भानावर आली आणि म्हणाली, “खरंच?”

“हो, घरी जातोय.” मी तिच्याकडे बघत म्हटलं. माझ्या ह्या वाक्याने तिचा चेहरा पडला. ती माझ्याकडे न पाहताच म्हणाली, “जायचंच होतं तर मग आलात कशाला?”

मला काय बोलावं ते सुचत नव्हतं. ती भावुक झाली होती हे मी ओळखलं होतं. माझी परिस्थितीसुद्धा काही वेगळी नव्हती. मग काही वेळ असाच शांततेत गेला. मग तिच्याकडे बघत मी म्हणालो, “माझा प्रश्नाचं उत्तर नाही दिलं तुम्ही?”

“मला थोडा वेळ द्या विचार करायला.” ती माझ्याकडे बघत म्हणाली.

“ठीक आहे, मजा करा सुट्ट्यांमध्ये.” असं म्हणून मी उठतोय हे बघून ती म्हणाली, “काय घाई आहे? बसलो असतो अजून थोडं.”

“माझीसुद्धा इच्छा आहे हो बसण्याची, पण खोलीत खूप पसारा झालाय शिवाय उद्याची तयारी करायची आहे. माफ करा. मनात असून थांबता येत नाहीये.” माझ्या ह्या बोलण्यावर ती निरुत्तर झाली. शेवटी मी निघालो. मागे वळून बघितलं तर ती बसलेलीच होती. मला खरंच अजून काही वेळ घालवायचा होता पण वेळ मर्यादित होती. मी थोड्या खिन्न मनाने खोलीवर आलो. आवरायला घेतलं. कशातच मन लागत नव्हतं. पण करणं भाग होतं.

दुसऱ्या दिवशी लवकर तयार होऊन पुणे स्टेशनला गेलो. तीन वर्षांपूर्वी आलो तेव्हा कसा होतो मी? काय गमावलं, काय कमावलं? याचा विचार करत मी माझ्या जागेवर बसलो. गाडी सुटायला अजून अवकाश होता. मी समान वगैरे ठेवत होतो. भरपूर समान आणलं होतं घरून. पण फक्त आणलंच होतं, आता सर्व एकाच वेळी घेऊन जात होतो. मी पेट्या वगैरे नीट ठेवत असताना माझ्यासमोर एक सावली दिसली. वर बघून पाहतो तर ती सुधा

होती. माला आश्चर्याचा धक्का बसला. मी तिला बघून क्षणभर थबकलोच.

मला काही बोलू न देताच ती म्हणाली, "मी विचार केलाय. अरुण, मला आवडेल तुझ्यासोबत संसार करायला." असं म्हणून तो लाजेने लाल झाली आणि लघवी हसू लागली. नजर मात्र खालीच होती आणि उगाचच केसांच्या बटेशी चाळा करत होती. तिने मला एकामागून एक दोन अनपेक्षित धक्के दिले होते. एक म्हणजे मी विचारसुद्धा केला नव्हता, ती मला थेट पुणे स्टेशन वर भेटायला येईल असा आणि दुसरं म्हणजे तिला माझ्याशी संसार वगैरे करण्याची इच्छा होईल. तिचं बोलणं ऐकून मी सीटवर बसलो. माझ्यासमोर ती बसली. नेहमीप्रमाणे गहन प्रश्न, काय बोलावं?

तिची खेचवी या उद्देशाने मी म्हणालो, "ठीक आहे, तुझा विचार झाला. पण माझं काय? मला वेळ हवा विचार करायला." माझ्या ह्या वाक्याने ती बुचकळयात पडली. मी मजा घेतोय की खरं बोलतोय हे तिला कळत नव्हतं. माझ्या चेहऱ्यावरचे भाव मी अगदी निर्विकार ठेवले होते. आतून कितीही गुलाबी गुदगुल्या होत असल्या तरीही. मग ती म्हणाली, "गाडी सुटेपर्यंत वेळ आहे."

यावेळी मी खळखळून हसलो. मी तिची मजा घेत होतो हे लक्षात येताच दोघं हसायला लागलो आणि हसता हसता केव्हा

हातात हात घेतले तेच कळलं नाही. मग भानावर आल्यावर तिने हात सोडवण्याचा प्रयत्न केला तेव्हा मी म्हटलो, "राहू देत आता. कायमचेच." ती परत लाजली.

मी हात सोडत म्हणालो, "तू घरी सांगितलं का?"

"वेडा आहेस का? कशाला इतक्यात. वेळ आल्यावर सांगेन. अजून तीन वर्ष काढायचे आहेत तुझ्यासोबत आणि नंतर संपूर्ण आयुष्य." तिचं हे बोलणं ऐकून मी लाजलो. गाडी सुटण्याची सूचना झाली तशी ती उठून गाडीच्या बाहेर आली आणि खिडकीपाशी येऊन थांबली. मी तिला म्हणालो, "मी परत येईपर्यंत काहीतरी आठवण म्हणून दे." तिने लगेच तिचा रुमाल दिला. मी तो पेटीत ठेवायला लागलो तेव्हा ती म्हणाली, "आणि मला काय?" तेव्हा मला त्या माझ्या रुमालाची आठवण झाली, ज्याच्यावर ती बसली होती. मी पेटीच्या एका कोपऱ्यातून काढून तो दिला. मीसुद्धा रुमाल दिला हे पाहून ती हसली तेव्हा मी म्हणालो, "ह्या रुमालाला लायब्ररीत तुझा स्पर्श झाला म्हणून मी जपून ठेवला होता. आपल्या सोबतच्या पहिल्या अभ्यासाचा साक्षीदार आहे तो." माझं बोलणं ऐकून ती खली बघत स्मितहास्य वगैरे करू लागली. गाडी सुटण्याची शेवटची सूचना झाली, भोंगा वाजला आणि गाडी सुटली. मी तिला बघितलं तेव्हा ती डोळे

टिपत होती. तिने हात हलवून मला निरोप दिला. मीसुद्धा हात हलवला. प्रवास तिच्या आठवणीत कसा गेला हे कळलंसुद्धा नाही. मग कशाबशा सुट्ट्या ढकलल्या आणि मास्टर्ससाठी म्हणून परत एकदा पुण्यनगरीत आलो.

†††

सायंकाळ होत आली होती. प्रार्थनेची वेळ जवळ येत होती. महाजन काकांनी तसं सांगितलं. सर्वजण उठून मग हळूहळू मंदिराकडे जाऊ लागले. आज महाजन काकांचा दिवस होता. आज फक्त तेच बोलणार होते आणि बाकी सर्वजण ऐकणार होते. प्रार्थनेला अजून काही वेळ होता आणि कुणी आलं नव्हतं त्यामुळे जोशीकाकांनी अतिशय उत्कंठेने विचारलं, “मग पुढे काय झालं?”

महाजन काकांनी त्यांच्याकडे पाहिलं आणि म्हणाले, “जोशी, अरे दिवसभर लेक्चर देऊन दामलोय मी. कॉलेजमध्ये शिकवायला असतांनासुद्धा इतका बोललो नव्हतो कधी.” त्यांच्या ह्या वाक्यावर सर्व मंडळी खळखळून हसू लागली. त्यांना असं हसताना पाहून बर्वेकाकू जवळ आल्या आणि बर्वेकाकांना म्हणल्या, “काय

चाललंय आज? आम्हाला कळू तरी द्या. दिवसभर महाजनांच्या खोलीत आहात तुम्ही.”

“तो चरित्र सांगतोय.” बर्वेकाकांच्या तोंडातून अचानकपणे बाहेर पडले.

“चरित्र म्हणजे, आत्मचरित्र वगैरे कसं लिहितात?” त्याबद्दल माहिती देतोय. जोशींनी वेळ मारून नेली.

बर्वेकाकू गेल्यावर जोशी चिडून म्हणाले, “बर्व्या, आता भांडेफोड झाली असती ना, तर तुला सोडलं नसतं बघ.”

प्रार्थना झाली, आज सुधाकाकू आल्या नव्हत्या. महाजन काकांचे डोळे त्यांनाच शोधत होते. त्या आल्या नाहीत असं बघून त्यांनी चेहऱ्यावर नाराजीचे भाव न आणू देता प्रार्थना म्हटली आणि पाटांगणाकडे जाऊ लागले, मंडळी सोबत होतीच. मग एका बाकावर बसून महाजन काकांनी उत्तरार्धाला सुरुवात केली,

नाशीब आमच्या सोबत होतं. यावेळी सुद्धा आम्ही एकाच वर्गात होतो. त्यामुळे आमच्या आनंदाला पारावार नव्हता. आता आम्ही एकमेकांना नावाने हाक मारायला लागलो होतो. त्यामुले अजून जवळीक वाढली होती. कॉलेजच्या पहिल्या दिवशीतर आम्ही लेक्चरला बसलोच नाही. दिवसभर गप्पा मारत बसलो.

तिने पहिलाच प्रश्न केला, “अरुण, तू मला तुझा पत्ता का नाही दिलास?”

“अगं पत्ता दिला असता तर तू मला पत्रं पाठवली असतीस. मगं मला उत्तर पाठवावं लागलं असतं. माझ्या घरी जाऊ दे, कुणाला वाचता नाही येत. तुझ्या घरी कुणी बघितलं असतं तर तुझ्या बाबांनी आमच्या इथल्या पोलिस स्टेशनला फोन लाऊन मला बेड्या ठोकायला लावल्या असत्या. मग लग्नाच्या बेड्यांऐवजी दुसऱ्याच बेड्या पडल्या असत्या हातात.” मी सांगितलं.

या बोलण्यावर ती आधी हसली आणि मग थोडी गंभीर झाली, “खरंय, रे तुझं. मी या साऱ्या गोष्टींचा विचार केलाच नव्हता. यावर विचार करावा लागेल आणि तुला कसं सुचतं रे इतका दूरचा विचार करायला?”

“एकाच गोष्टीचा सतत विचार केला तर ती गोष्ट आपल्या मनात खोलवर जाते आणि त्या गोष्टीची विचार करण्याची सूत्रं मेंदुकडून हृदयाकडे जातात आणि प्रेमाच्या बाबतीत हृदयाचं नाही ऐकणार तर कुणाचं?” मी सविस्तर खुलासा केला.

माझ्या ह्या वाक्यावर ती माझ्याकडे स्तिमित होऊन बघू लागली आणि म्हणाली, “तुला असं बोलायला कसं सुचतं रे?”

“ही एक ईश्वरदत्त देणगी आहे, कुणालाही नाही मिळत. तुझं नशीब चांगलं की तुला आयुष्यभर अशीच वाक्यं ऐकावी लागणार आहेत.” माझ्या ह्या वाक्यावर मात्र तिने माझ्या दंडाला जोरात चिमटा काढला.

मग परत ते सोनेरी दिवस सुरू झाले. तीन वर्ष कशी गेली ते कळलंसुद्धा नाही. या तीन वर्षांत आणि मागील तीन वर्षांत आमच्यात कधी भांडण झाल्याचं मला आठवत नाही. आम्ही एकमेकांवर प्रेम करायचो पण इतरांसारख्या भल्यामोठ्या अपेक्षा नव्हत्या. आम्ही कधीच कॉलेजच्या बाहेर भेटलो नाही. कधी सिनेमाला गेलो नाही. फक्त आमचं एकमेकांसोबत असणं हे आमच्यासाठी खूप होतं. तिने फूल मळावं आणि मी त्याची स्तुती करावी. कधी फूल नसलंच तर त्याचं नेहमीचं कारण मी ऐकावं. कधीकधी तर मीच तिच्या ढंगात कारण सांगताना तीला हसताना बघण्याचा एक वेगळाच आनंद होता. आम्ही दोघांनी खूप स्वप्न पहिली होती. स्वप्न खूप होती पण लहानशी होती. हां, एक स्वप्न मोठं होतं, आम्हाला दोघांना प्राध्यापक व्हायचं होतं. त्या दृष्टीने तयारी सुरू होती.

शेवटचा पेपर होता. त्या सायंकाळी मला तिच्या घरी जायचं होतं. तिने घरी काही सांगितलं नव्हतं. पण घरच्यांना अट

घातली होती, जर प्राध्यापक झाले तर माझ्या पसंतीच्या मुलाशी लग्न करून द्यावं. घरच्यांनी थोडेफार आढेवेढे घेतले होते, पण नंतर ते तयार झाले. त्यामुळे आम्ही दोघं आनंदात होतो. पेपर झाला. तिला भेटायाला म्हणून गेलो तर ती माझ्यापेक्षा जास्त घाईत होती. मला म्हणली, “आज एक राजकुमार येणार आहे आमच्याकडे. माझा हात मागणार आहे तो. त्याच्यासाठी मस्तपैकी स्वैपाक करायचा आहे.”

मी गालातल्या गालात हसत म्हणालो, “अच्छा, म्हणून घाई आहे का? पण मला बोलायचं आहे तुझ्याशी. थोडं थांब ना.”

“नाही, खरंच घाई आहे. आता चार वाजलेत. तू सात वाजेपर्यंत येणार मग कसं होईल?” ती पुढे जात होती आणि मी तिला थांबवत होतो.

“बरं एकदा मागे वळून तरी बघ.” मी आर्जव केली.

तिने मागे वळून बघितलं. त्या एका मिनिटांत मला मागची सहा वर्ष आठवली. कितीतरी बदललो होतो मी सहा वर्षात, सुधासाठी. मुलींशी न बोलणारा मी, आता सुधाशिवाय राहवत नव्हतं. तिच्याकडे बघतंच राहावं असं वाटत होतं. आम्ही सोबत गेटच्या बाहेर आलो. ती तिच्या वाटेला वळली आणी मागे वळून माझ्याकडे बघत हात हलवला. मीसुद्धा तिला बाय करून

खोलीकडे निघालो. का? काय माहीत? पण त्या दिवशी तिच्याकडे बघतंच राहावंस वाटत होतं.

तिच्या घरचा पत्ता तिने एका कागदावर लिहून दिला होता. तिथे ते भाड्याच्या खोलीत रहायचे. शनिपारला वळसा घालून मग कुठेतरी बोळीत तिचं घर होतं. रस्त्यात मी एक पुष्पगुच्छ घेतला. सुमारे पावणे सातच्या सुमारास पोहोचलो. तिथं माला बरीच गर्दी दिसली. माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली. काहीतरी अघटित घडलं होतं. मी एकला विचारलं तर त्याने सांगितलं की इन्स्पेक्टर साठे हे जेलमधून पळून जाणाऱ्या कैद्याला अडवताना कैद्याने केलेल्या चाकू हल्ल्यात जखमी झाले आणि आता काही वेळापूर्वी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. हे ऐकून माझ्या पायाखालची जमीन सरकली. डोळ्यांपुढे अंधारी यायला लागली. पेपर संपल्यावर आनंदात असणारी सुधा आता कशी असेल? या विचाराने मला दरारून घाम फुटला. तिला बघण्याचीसुद्धा हिंमत होत नव्हती. मी आणलेला पुष्पगुच्छ साठेंच्या प्रेतावर अर्पण केला. त्यांना भेट म्हणून आणलेली वस्तु त्यांना अशा प्रकारे द्यावी लागेल असा विचार मी स्वप्नातसुद्धा केला नव्हता. मी दुरून पहिलं सुधा आणि तिची आई धाय मोकलून रडत होत्या. होत्याचं नव्हतं झालं होतं.

मी तिथून निघालो आणि थेट खोलीवर आलो. दोन दिवस जेवण केलं नाही. घरून पत्रं येत होती, “परीक्षा झाली, केव्हा येणार आहेस?” मी काहीतरी कारण सांगून वेळ मारून नेत होतो. घटना घडल्याच्या दहाव्या दिवशी मी तिचं सांत्वन करायला तिच्या घराची वाट धरली. कोण काय म्हणेल याचा विचार केला नव्हता. कारण या वेळी माझी सर्वात जास्त गरज तिला होती. तिच्या घरी पोहोचलो तर तिथं कुलूप होते. शेजारी विचारलं तर समजलं, सुधा आणि तिची आई आजोळी राहायला गेलेत कायमचे. मी मटकन खाली बसलो. काय करावं ते सुचत नव्हतं. मी शनिपारला आलो. तिथल्या मंदीरासमोर बराच वेळ नसून राहिलो. माझ्या डोळ्यासमोर शेवट्याच्या दिवशी पाहिलेली सुधा येत होती. आनंदात असणारी आणि रडणारी. तिचं आजोळ माला माहिती नव्हतं. मी दुसऱ्या दिवशी कॉलेजला गेलो. तिथून माहिती काढण्याचा प्रयत्न केला पण काहीच हातात आलं नाही. तिच्या मैत्रिणींशी संपर्क केला. त्यांनाही काहीच माहिती नव्हतं. जवळपास महिनाभर मी सुधाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण काही यश आलं नाही. शेवटी घरी परतलो. झालेलं सर्व विसरायला जवळपास सहा महीने लागले. त्यासाठी नदी आणि शेताचा सहारा घेतला. तिथंसुद्धा तिची आठवण यायचीच. मग हळूहळू पूर्वपदावर आलो. प्राध्यापक पदासाठी भरपूर कॉलेजमध्ये अर्ज केले. शेवटी

प्राध्यापक झालो. नंतर प्रत्येक वेळी सुधाची शक्य तेवढी माहिती काढण्याचा प्रयत्न केला. पण नाही सापडली ती. तिचा रुमाल आणि तिच्या घरचा पत्ता असलेला कागद एवढंच शिल्लक होतं माझ्याजवळ आणि अजूनसुद्धा आहे. असं म्हणत त्यांनी त्यांच्या पाकीटातून तो कागद काढून सगळ्यांना दाखवला. तो बघताना सर्वांच्या डोळ्यांतून अश्रू सुरू झाले होते.

†††

त्या दिवशी जेवणानंतर सर्वांनी मिळून महाजन काकांना समजावलं, "बघ, इतक्या वर्षांनी तुझं प्रेम तुला परत मिळालंय. म्हणजे तुझ्या समोर आलंय. तुझं आपलं आणि हक्काचं असं कुणी राहिलेलं नाही. त्यांनासुद्धा कुणी नाही असं दिसतंय नाहीतर त्या वृद्धाश्रमात आल्या नसत्या. तू स्वतःहून बोल त्यांच्याशी. त्यांना चांगलं वाटेल. त्या इथं नवीन आहेत. मन रामायला वेळ लागेल. कर विचार."

महाजन काकांनी विचार केला, मंडळी सांगत होती ते देखील खरंच होतं म्हणा. दोघांच्या आयुष्यात एकाकीपणा अगदी अमावास्येच्या काळयाकुट्ट अंधारासारखा भरला होता. इतक्या

वर्षांनी पहिलं प्रेम समोर येणं हे केवळ योगायोगाने झालं नव्हतं, ती नियतीची एक ठरवलेली गोष्ट होती. आयुष्याच्या शेवटी का असेना दोघांना एकत्र आणून शेवट गोड करण्याची ती दैवी योजना होती. महाजन काकांनी सुधाकाकूंशी आपणहून बोलण्याचं ठरवलं. जवळपास अर्धा तास ते विचार करत अस्वस्थपणे फेऱ्या मारत होते आणि बाकी काका मंडळी बाकावर बसून त्यांच्या उत्तराची वाट बघत होती. बराच विचार करून महाजन काका बाकासमोर आले आणि काहीशा निर्धाराने म्हणाले, “मी बोलतो. आताच बोलतो.”

किचनमध्ये मदतीसाठी जाण्याची वेळ झाली होती. आज कुणी न बोलवताच चौघंजण किचनकडे जाऊ लागले. इतरांच्या चालण्यात एक उत्साह होता. पण महाजन काका मात्र संमिश्र भावनांनी चालत होते. किचनमध्ये जाताच जोशीकाकू दिसल्या. महाजन काकांनी जोशींकडे एक कटाक्ष टाकला. जोशी समजले, त्यांनी जोशीकाकूंना काहितरी सांगितलं. जोशीकाका आले, त्यांनी महाजन काकांना सांगितलं, “तू बाहेर थांब. आम्ही करतो आज.”

जोशींच्या सांगण्यानुसार महाजन बाहेर थांबले. उगाचच हात मागे बांधून वरती आकाशाकडे बघत फेऱ्या मारू लागले. पाच दहा मिनिटांनातर एक स्त्री किचनमधून बाहेर आली आणि सरळ मंदिराकडे जाऊ लागली. महाजन काकांनी बघितलं, त्या

सुधाकाकू होत्या. त्या महाजन काकांच्या पुढे निघून गेल्या होत्या. मनातलं सर्व बळ एकवटून महाजनकाका म्हणाले, "मी त्या दिवशी आलो होतो. नंतर तुम्ही घर सोडल्यावरसुद्धा आलो होतो. खूप शोधलं तुला. पण तू सापडलीच नाहीस."

अचानक आलेल्या आवाजाने सुधाकाकू दचकल्या. त्यांनी मागे वळून बघितलं आणि क्षणभर स्तब्ध झाल्या. महाजन काकांना बघून त्यांचा विश्वासच बसत नव्हता. इतक्या वर्षनंतर आणि अशा जागेवर. त्या उद्गारल्या, "अरुण तू?"

"हो सुधा, मी अरुण महाजन." महाजन काकांना आता बोलणं अवघड होत होतं. सुधा काकूंच्या डोळयांतून केव्हाच अश्रु सुरू झाले होते. महाजन काकांनी सुद्धा अश्रूंना वाट मोकळी करून दिली. ते दोघं एकमेकांच्या बाहुपाशात केव्हा विसावले ते त्यांनाच कळलं नाही. भावनांचा आवेग ओसरल्यावर आणि भानावर आल्यावर ते विलग झाले. मग काही वेळ असाच भयाण शांततेत गेला. यावेळी महाजन काकांनी पुढाकार घेत विचारलं, "कुठं होतीस तू इतके दिवस?"

"मी तुझ्या आठवणींत होते." सुधाकाकू अश्रू पुसत म्हणल्या. मग परत काही वेळ शांतता पसरली. आपलं दुःख सांगण्ययसाठी बळ मिळावं म्हणून सुधाकाकू मनाने तयार होत

होत्या. महाजनकाका सुद्धा गप्पच होते. मग मनाची तयारी झाल्यावर सुधाकाकू म्हणल्या,

आपला पेपर संपल्यावर मी घरी गेले तेव्हा घराला कुलूप होते. शेजारी विचारलं तेव्हा समजलं, मी जवळपास पळतच हॉस्पिटल गाठलं. तिथं पोहोचण्याआधीच बाबांनी जग सोडलं होतं. आम्हाला आमच्या जवळचं असं कुणीच नव्हतं. मग आम्ही लगेचच आजोळी राहायला जाण्याच्या निर्णय घेतला. इतक्या तडकाफडकी निर्णय घेतला गेला की काही विचार करायला वेळच मिळाला नाही. बाबांच दुःख आणि तू सोबत नसल्याचं दुःख अशी दोन रक्षसं माझ्या जिवावर उठली होती. अनेकदा आत्महत्या करण्याचा विचार मनात आला. पण आईकडे पाहून ते पाऊल मागे घ्यावं लागलं. पण आता या क्षणाला वाटतंय की बरं झालं मी मृत्युला कवटाळलं नाही, नाहीतर आजचा दिवस पाहिला नसता.

आजोळी असलेल्या पोलिस स्टेशन मध्ये बाबांच्या जागी काम होण्यासाठी खूप प्रयत्न केले. आजोबांनी खूप ठिकाणी नाक घासल्यावर तिथं शिपायाची नोकरी लागली. प्राध्यापकाचं स्वप्न अपूर्ण राहिलं. त्या वेळी तुझी खूपच आठवण यायची. पण नाईलाज होता. मग लगेचच माझं लग्न लाऊन दिलं. मी नाही वगैरे म्हणण्याचा काही प्रश्नच नव्हता. मी आईला माझ्या सासरी घेऊन

आली. माझा नवरा पुण्यातच एका खाजगी कंपनीत नोकरीला होता. हळूहळू बाबांचं दुःख आम्ही विसरत होतो. माझा नवरा स्वभावाने चांगला होता. त्याने खूप समजून घेतलं. मी माझी नोकरी सुरूच ठेवली होती. लग्नानंतर दुसऱ्या वर्षी आम्हाला मुलगा झाला. त्याचं नाव शंतनू ठेवलं. त्याला खेळवताना आईचा वेळ आनंदात जायचा. त्याच्या बोबड्या बोलांनी आम्हाला खूप आनंद व्हायचा. आता सर्व अरिष्ट टळली असं वाटत असतानाच शंतनूच्या बाबांचा अपघाती मृत्यू झाला. माझ्यावर आभाळ कोसळलं. माझ्या मनात परत आत्महत्येचे विचार येऊ लागले. त्यावेळी मी शंतनूकडे पाहिलं आणि सर्व दुःख गिळून टाकलं.

हळूहळू शंतनू मोठा झाला. त्याच्या बाबांसारखाच हुशार निघाला. त्याला इंजिनीअर बनवलं. शिक्षण पूर्ण होताच तो मोठ्या कंपनीत नोकरीला लागला तेव्हा मी माझी नोकरी सोडली. त्याच्या लग्नासाठी म्हणून स्थळं बघायला सुरुवात केली. त्याला एकही स्थळ पटत नव्हतं. शेवटी त्याला विश्वासात घेऊन विचारलं, तेव्हा समजलं त्याचं एका मुलीवर प्रेम आहे. माझं तुझ्याशी लग्न करण्याचं स्वप्न तुटलं म्हणून मी त्याच्यावर अन्याय करणार नव्हते. मी त्याला लगेच होकार दिला. यथावकाश सूनबाई घरात आल्या. आतापर्यंत भरपूर दुःख आली होती, त्यांना सहन करण्याची ताकद दिल्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानले. शंतनू आणि त्याची

बायको रोज सकाळी कामावर जात ते सायंकाळीच परत येत. त्यामुळे घरातली सर्व कामं मीच करू लागली. पण आमच्या सूनबाईंच्या मनात काहीसं वेगळंच होतं. आधी चांगली वागणारी ती माझ्याशी मनाला वाटेल तसं वागू लागली. कामाच्या ताणामुळे ती चिडत असेल म्हणून मी काही बोलले नाही. शंतनूने सुद्धा दुर्लक्ष केलं. मग हळूहळू तोसुद्धा माझ्याशी नीट वागेनसा झाला. मी सहनच करत गेले. पण एके दिवशी माझा संयम सुटला आणि आमच्या तिघांत खूप भांडण झालं. काही दिवस असेच शांततेत गेले. पण मला काय माहीत ती वादळापूर्वीची शांतता होती.

एके दिवशी शंतनू माझ्याजवळ आला आणि आनंदात म्हणाला, “आई, मला फार मोठा प्रोजेक्ट मिळाला आहे. माझं स्वप्न होतं अशा प्रकारच्या प्रोजेक्टवर काम करण्याचं. पण एक अडचण आहे. प्रोजेक्टसाठी म्हैसूरला जावं लागणार आहे. कदाचीत अडीच वर्ष आणि त्यात अजून एक म्हणजे पुजाला सुद्धा म्हैसूरला नोकरी लागली आहे.”

तो सर्वच ठरवून आला होता. देवाने आतापर्यंत तारलं होतं आणि आताही तोच मार्ग दाखवणार होता. त्यामुळे सर्वकाही त्याच्या भरवशावर सोडून मी म्हणाले, “अभिनंदन तुझं आणि

तिलाही सांग. ती तर काही बोलत नाही माझ्याशी. केव्हा जाणार आहात मग आता?”

“आठवडाभरत निघू. एक सांगू का?” त्याने थोडं घाबरं होत विचारलं.

“सांग. काय झालं?” मला अंदाज येत होता.

“तुझी हरकत नसेल तर तू अडीच वर्ष ‘निवारा ओल्ड केयर’ला राहशील का? म्हैसूरला तुला करमणार नाही. शिवाय भाषा आणि माणसं वेगळी.”

“हो, का नाही. चालेल मला.” काळजवर दगड ठेऊन मी बोलले. माझा अंदाज खरा ठरला होता. त्यांनी मला वृद्धाश्रमात हाकलण्याचं ठरवलं होतं.

मग आठवडाभर त्यांनी त्यांची आणि मी माझी तयारी केली आणि परवा मला निवाऱ्यात सोडून गेले म्हैसूरला. एक वेळ अपंगत्व बरं, पण परवालंबत्व नको.

महाजनकाका सुधाकाकूंची गोष्ट ऐकताना सुन्न झाले होते. काय बोलावं हे त्यांनाही सुचत नव्हतं. मग काही वेळाने ते म्हणाले, “माझी गोष्ट जरा वेगळी आहे. माझी बायको सहा वर्षांपूर्वी वारली. मुलगा शिक्षणासाठी म्हणून परदेशात गेला तो कायमचाच. त्याच्या आईला ठेवायलासुद्धा आला नाही. त्यमुळे तो माझ्यासाठी

मेलेलाच आहे. साधारणतः एक वर्ष झालं मला येऊन. परवा तू दिसलीस आणि आयुष्यात जगण्याची एक नवीन आशा पल्लवित झाली बघ."

†††

महाजन काका आणि सुधाकाकू आता खुलले होते. त्यांनी मस्त आणि आनंदी आयुष्य जगायला सुरुवात केली होती. सुधाकाकू केसांत रोज एक फूल मळायच्या आणि महाजन काका त्यांची स्तुती करायचे. त्या दोघांना असं आनंदात बघून बर्वेकाका, जोशी आदि मंडळींच्या चेहऱ्यावर समाधानाची एक झलक दिसू लागली होती. आयुष्याच्या उतारवयात का होईना त्यांच्या मित्राला त्यांचं प्रेम मिळालं होतं. महाजन काका आता खुलले होते. त्यांच्या वागण्याबोलण्यात एक वेगळाच उत्साह जाणवत होता. सुधाकाकूंचं काही वेगळं नव्हतं. त्यासुद्धा झालं-गेलं ते विसरून छान जगत होत्या. रोज सकाळी नाश्त्याच्या वेळी, जेवताना, सायंकाळी प्रार्थनेच्या वेळी, किचनमध्ये मदतीला या ठिकाणी दोघं भेटत असत. त्यांच्यात नेहमी सकारात्मक संवाद व्हायचे. झालेल्या जुन्या गोष्टी विसरायच्या असं त्यांच्यात ठरलं होतं. त्यांचं असं

वागणं बघून जोशी, बर्वे यांच्या पत्नी हसून टोमणे मारत महाजन-कदमांचं उदाहरण द्यायच्या. सायंकाळी प्रार्थनेनंतर महाजन काका मित्रांसोबत गप्पा मारायला क्वचितच जात. ते थेट किचनमध्ये मदतीला जात. तिथे सुधा काकूंसोबत गप्पा करताना मदत करत. मग काही वेळाने जोशी वगैरे मंडळी यायची. महाजन काकांना बघून उगाचच मजा घ्यायचे. म्हणायचे, "महाजन, पाय मोकळे करायला नाही आलात राव तुम्ही. आम्ही केव्हापासून वाट बघतोय तुमची. हा बर्वे तुम्हाला खोलीतसुद्धा शोधून आला, तिथेही नव्हतात. मग इथे आलो. म्हणजे तुम्हाला खूप भूक लागली म्हणून लवकर आलात की अजून काही?"

हे असं बोलणं ऐकून महाजन गालातल्या गालात हसायचे आणि म्हणायचे, "तुम्हाला सोयिस्कर वाटेल ते कारण निवडा. माझी काही हरकत नाही." अशा पद्धतीने मजेत दिवस चालले होते. महाजन काका आणि सुधा काकूंना आयुष्यात जेवढा आनंद मिळाला नव्हता तेवढा आता मिळत होता. मागे रेग्युलर चेक-अप साठी निवऱ्यात डॉक्टर आले होते. महिनाभराने सर्वांची तपासणी करण्यासाठी स्वेच्छेने डॉक्टर येत असत. या महिन्याच्या तपासणीत महाजन काकांची शुगर खूप जास्त कंट्रोलमध्ये अढळली. डॉक्टर आश्चर्यचकित झाले. त्यांनी कारण विचारलं तेव्हा त्यांना कसं सांगावं या गोड प्रश्नात महाजनकाका पडले. तेव्हा मॅनेजरने

समजावून सांगितलं. डॉक्टरांनी अभिनंदन केलं तेव्हा मात्र महाजन काका गालात हसत होते. हे असे दिवस जगत असताना कुठले रोग आणि काय?

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त रात्री कार्यक्रम होता. रात्री साडेबारा पर्यन्त गोड दूध चंद्र प्रकाशात ठेऊन मग प्राशन करायचे होते. तोपर्यंत जागरण व्हावं म्हणून पिठोरी चंद्र किरणांत सर्वजण शेकोटी भोवती बसले होते. मनोरंजन म्हणून गाण्यांच्या भेंड्या खेळण्याचा आग्रहाने उचल खाल्ली होती. सर्वांच्या मागणीला मॅनेजरने आढेवेढे न घेता होकार दिला आणि गाण्यांच्या भेंड्या सुरू झाल्या. महिला आणि पुरुष असे दोन गट पाडले होते. दोन्ही गट एकमेकांवर प्रत्युत्तरादाखल सुरेल गाण्यांची मुक्तकंठाने उधळण करत होते. दुग्धपान करायला थोडाच वेळ बाकी होता आणि दोघं गटांच्या सारख्याच भेंड्या होत्या. तेव्हा महिला आणि पुरुष यांच्यातून एकाने एक गाणं म्हणायचं, त्यात ज्याचं गाणं चांगलं असेल तो गट जिंकेल असं एकमताने ठरलं. फक्त आपलं मत हे खरं असावं असं आग्रह होता. म्हणजे तशी भावनिक साद घालून मॅनेजरने मंडळींकडून वदवून घेतलं होतं. पुरुष वर्गातून महाजन काका गाणं म्हणणार होते, त्यांनी सुरुवात केली,

शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले.....

प्रथम तुला पाहियले आणिक घडू नये ते घडले.....

इतकं म्हणताच टाळ्यांचा कडकडाट सुरू झाला. महाजनांचा गळा गोड होता. टाळ्यांचा आवाज संपल्यावर पुढचं कडवं म्हणायला सुरुवात करणार तोच महिलांमधून त्याच तोडीचा सुरेल आवाज कानावर आला. सर्वांनी चमकून तिकडे पहिलं. सुधाकाकू गात होत्या,

अर्थ नवा गीतास मिळाला.....

छंद अवा अन ताल निराळा.....

त्या दिवशी का प्रथमच माझे सुर सांग अवघडले?.....

या कडव्यावर आधीपेक्षा जास्त टाळ्यांचा आवाज झाला. महाजन काका आणि सुधाकाकू एकमेकांकडे बघत स्मितहास्य करत होते. त्या दोघांनी सोबतच शेवटचं कडवं म्हणत जुगलबंदीची सांगता केली. एकाच वेळी सारखे शब्द दोन गळ्यांतून बाहेर पडू लागले,

आठवते पुनवेच्या रात्री.....

लक्ष दीप विरघळले गात्री.....

मिठीत तुझीया या विश्वाचे रहस्य मज उलगडले....

प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात सर्वांनी दोघांचे तोंडभरून कौतुक केले.

दिवाळी तोंडावर आली होती. नेहमीप्रमाणे या वर्षीसुद्धा दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी होणार होती. या वृद्धाश्रमाचं एक वैशिष्ट्य होतं, सर्व सण वगैरे अगदी उत्साहात आणि आनंदात साजरे होत. या निमित्ताने सर्वांच्या चेहऱ्यावर थोडाफार आनंद दिसायचा. गोड-धोड जेवण बनवताना सर्वांचा भलमोठा अनुभव कामात यायचा. ते पदार्थ तयार करताना सर्वांचा हातभार लागायचा. त्यामुळे बनणारे पदार्थ हे चवसंपन्न असायचे. त्यांच्यात अनुभवांचा गोडवा आणि मायेचा कुरकुरीतपणा असायचा. त्या दिवशी सायंकाळी प्रार्थनेला मॅनेजर उपस्थित होते. त्यांनी दिवाळी विषयी औपचारिक घोषणा केली. ते म्हणाले, "नमस्कार, दरवर्षप्रमाणे यावर्षी देखील आपल्याला नेहमीसारखी धडाक्यात दिवाळी साजरी करायची आहे. तत्पूर्वी, फराळ करायला लवकरच सुरुवात करावी लागेल. सर्व पदार्थ एकदम चविष्ट झाले पाहिजेत. चकल्या तळताना येणारा खमंग वास दूरवर पसरला पाहिजे. आपण उद्यापासूनच सुरुवात करूया. रोज शक्य होईल तेवढं करुयात."

दिवाळीची जय्यत तयारी सुरू झाली. लाडू वळायला हात अपुरे पडू लागले. विविध खाद्यपदार्थांच्या वासाने परिसर भरून गेला. मॅनेजर दुरूनच गंमत बघून ऑफिसमध्ये बसायचा. त्यांच्या चेहऱ्यावरील लगबग, चिकित्सा, आनंद बघून त्याचं जीवन सार्थकी लागल्यासारखं वाटायचं. कुणाचा आनंद कशात तर

कुणाचा कशात. शोधला पाहिजे फक्त. गोवत्स द्वादशी ते भाऊबीजेपर्यंत सर्व सण अगदी यथासांग साजरे झाले.

सध्या बर्वे, जोशी वगैरे मंडळी त्यांच्या बायकांसोबत मॅनेजर सोबत चर्चेत जास्त वेळ घालवू लागली होती. महाजन काका सुधा काकूंसोबत जास्त वेळ घालवत असल्याने आधी त्यांच्या लक्षात नाही आलं. नंतर त्यांना तसं जाणवलं. त्यांनी जोशी काकांना तसं विचारलं. त्यांनी काहीतरी सांगून वेळ मारून नेली. पण महाजन काका आणि सुधाककूंच्या नकळत एक गोड कट शिजत होता. त्याची अंमलबजावणी तुळशी विवाहाच्या दिवशी होणार होती. सर्व तयारी गुप्तपणे सुरू होती.

त्या दिवशी सायंकाळी मॅनेजर परत एकदा बोलायला उभा राहिला. "भारतीय संस्कृतीतल्या अनेकविध उत्सवांपैकी एक, पण महत्वाचा उत्सव आपण येत्या काही दिवसांत साजरा करणार आहोत. 'तुळशी विवाह.' या वर्षी जोरात साजरा करुयात. जोशींना मंगलाष्टकं येतात. अण्णा वरपक्षाचे मामा म्हणून उभे राहतील. बर्वे वधूपक्षाचे मामा असतील. बाकी बरीच मंडळी विविध कामांसाठी उपोगत येतील. सर्वांच्या लक्षात राहील असा लग्नसोहाळा करू."

तुळशी विवाह जवळ येत होता. कामांची धांदल उडाली होती. एके दिवशी महाजन काका सुधाककूंना म्हणाले, "समजा

त्या दिवशी तुझ्या बाबांचं असं झालं नसतं तर पुढे काय झालं असतं?”

“मी त्या दिवशी तुझ्याशी लग्न करेल असं सांगणार होते. पण ठरलं होतं, प्राध्यापक झाल्यावर. आपण दोघं प्राध्यापक झाल्यावर मग लग्न केलं असतं आणि तू आमच्या घरीच राहिला असतास. घरजवई म्हणून.” सुधाकाकू महाजन काकांच्या डोळयांत बघत म्हणाल्या.

शेवटी तुळशी विवाहाचा दिवस उजाडला. वरपक्षीय मंडळींनी महाजन काकांना सकाळी हळदीसाठी म्हणून तयार केलं. महाजन काकांना समजत नव्हतं नेमकं काय सुरू आहे ते. सुधा काकूंची काही वेगळी परिस्थिती नव्हती. नंतर सर्व प्रकार त्यांच्या लक्षात आला. तुळशी विवाहाचं निमित्त करून महाजन काका आणि सुधाकाकूंना विवाहबंधनात अडकवण्याचा घाट घातला गेला होता. पटांगणात दोघांना हळद लावण्यात आली. दिवसभर कार्यक्रमांची रेलचेल सुरू होती. सर्व सोपस्कार यथाविधी पार पडत होते. गोरज मुहूर्तावर लग्न होतं. सर्व मंडळी म्हातारी होती पण उत्साह मात्र तरुणांचा होता. त्यांना बघून महाजन काका आणि सुधाकाकूंच्या डोळयात पाणी आलं. त्यांचं स्वप्न अशा प्रकारे

आयुष्याच्या शेवटी का होईना पूर्ण होणार होतं. मुहूर्तवेळ झाली, जोशींनी सुरुवात केली, स्वस्ति श्री गणनायकम गजमुखम.....

प्रत्येक श्लोकानंतर वधू-वर एकमेकांकडे बघून हसत होते. त्यांच्यावर अक्षतांचा वर्षाव होत होता. दोन्ही पक्षांच्या मामांनी अंतरपाट धरून ठेवला होता पण सर्वांचीच ऊंची सारखी असल्यामुळे वधू-वर एकमेकांना पाहू शकत होते.

जोशींच्या मुखमांडलातून शेवटचा श्लोक बाहेर पडला,

तदेव लग्नं सुदीनं तदैव ताराबलं चंद्रबलं तदेव विद्याबलं दैवबलं तदेव


लक्ष्मीपते तेऽन्घ्रियुगं स्मरामि.....!!!


अंतरपाट बाजूला झाले. वधु-वरांनी एकमेकांकडे लज्जायुक्त कटाक्ष टाकला. एकमेकांना माळा घालण्यात आल्या. इकडे अक्षतांचा वर्षाव सुरूच होता. दोघांच्या डोळयांतून नकळतच आनंदाश्रू सुरू झाले होते.....

†††

हे प्रत्येक पुस्तक वाचायलाच हवं.

फ़क्त क्लिक करा. पुस्तकच हजर होईल.






**ई साहित्य प्रतिष्ठानचं तेरावं वर्षं.**

**शुभम पाटील यांचं ई साहित्यवर हे पाचवं पुस्तक.**

शुभम जळगाव जिल्ह्यातल्या धरणगांवचे एक विद्यार्थी आहेत. त्यांच्यावर सरस्वती प्रसन्न आहे हे त्यांचं पुस्तक वाचताना जाणवेलच. एखादा सामान्य विषयही ते असा लिहीतात की वाचणाऱ्यासमोर सर्व काही जिवंत होतं. मग तो वाराणसी असो की वृद्धाश्रम. प्रतिभा आहे म्हणून ते लिहीत सुटत नाहीत. एक एक विषय घेऊन त्याच्या खोलात शिरून लिहितात व पुनर्लेखन करून आपल्या पुस्तकाला जास्तीत जास्त झळाळी आणतात. मेहनत घेतात. 'अभ्यासोनि प्रकटावे' हा त्यांचा मूलमंत्र आहे.

लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं कितीही चांगली असली तरी विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंत यांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५

लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्याची ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनुप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले,

अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी, सुजाता सिद्धा, विलास कोळी असे अनेक तरूण लेखक अभ्यासपुर्वक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com